सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, १७ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १४६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## पं. प्रदीप मिश्राजी यांची २३ ऑगस्ट पासून शिव महापुराण कथा : प्रतापराव पाटील चिखलीकर



नांदेड : नांदेड शहर व जिल्ह्यातील भाविक भक्तांना महाशिवपुराण कथा ऐकता यावी आणि धार्मिक सोहळ्यात सहभागी होता यावे यासाठी आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ता, भागवत भूषण , पं. प्रदीप मिश्राजी सिहोरवाले यांच्या वाणीतून बारा ज्योतिर्लिंग शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे . येत्या २३ ऑगस्ट पासून दुपारी १ ते ४ या वेळेत शिवमहापुराण कथा सुरू होईल अशी माहिती माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर व डॉ.शिवराज नांदेडकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली .

भाविक भक्तांची सेवा करता यावी यासाठी तत्कालीन खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून जयाकिशोरीजी यांची श्रीकृष्ण कथा आणि श्री राम कथा सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते . हजारो भाविक भक्तांनी या सत्संगाचा लाभ घेतला होता .भव्य दिव्य अशा सोहळ्यानंतर आता श्रावण मासाचे औचित्य साधत जिल्ह्यातील शिवभक्तांसाठी पं. प्रदीप मिश्राजी सीहोरवाले यांच्या वाणीतून बारा ज्योतिर्लिंग शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

मोदी मैदान असर्जन नांदेड येथे दिनांक २३ ते २९ ऑगस्ट या दरम्यान हा सोहळा पार पडणार असून या सोहळ्याला जास्तीत जास्त भाविक भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, डॉ. शिवराज नांदेडकर ,प्रशांत पातेवार , माजी आमदार ओमप्रकास पोकर्णा, जिल्हा परिषदेचे माजी सभापती संजय पाटील कराळे यांनी केले आहे.

# हरियाणा आणि जम्मू-काश्मिरमध्ये विधानसभा निवडणूक जाहीर

## हरियाणामध्ये एक तर जम्मू-काश्मिरमध्ये तीन टप्प्यात निवडणूक, ४ ऑक्टोबरला निकाल

नवी दिल्ली : हरियाणा आणि जम्मू काश्मिरच्या विधानसभा निवडणुकीसंदर्भातील कार्यक्रम निवडणूक आयोगाने (एश्रशलींळेप उेाळीीळेप) जाहीर केला आहे. यानुसार, हरियाणामध्ये एक टप्प्यात निवडणूक होणार असून १ ऑक्टोबर रोजी मतदान घेण्यात येईल. तर जम्मू काश्मिरमध्ये तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. या दोन्ही निवडणुकांचा निकाल ४ ऑक्टोबर रोजी जाहीर होणार आहे. महाराष्ट्राबाबत मात्र अद्याप कोणतीही घोषणा करण्यात आलेली नाही.

केंद्रीय निवडणूक आयोगाचे (एश्रशलींळेप उेाळीीळेप) मुख्य आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, जम्मू काश्मिरमध्ये पहिला टप्पा १८ सप्टेंबरला, दुसरा टप्पा २५ सप्टेंबरला आणि तिसऱ्या टप्प्यात एक ऑक्टोबरला मतदान



होणार आहे. तर हरियाणा आणि जम्मू काश्मिर या दोन्ही राज्यांचा निकाल ४ ऑक्टोबरला लागणार आहे.मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले की, हरियाणा विधानसभेची मुदत ३ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. हरियाणात एकूण ९० विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी ७३ सर्वसाधारण, एससी-१७ आणि एसटी-० आहेत. हरियाणात एकूण २.०१ कोटी मतदार असतील. त्यापैकी १.०६ पुरुष, ०.९५ कोटी महिला, ४.५२ लाख नवीन मतदार आणि ४०.९५ लाख युवा मतदार आहेत. हरियाणाची मतदार यादी २७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रसिद्ध होईल. जम्मू आणि काश्मीर हा विधानसभा असलेला केंद्रशासित प्रदेश आहे. पूर्ण राज्याचा दर्जा रद्द केल्यानंतर तेथील विधानसभेचे चित्रही बदलले आहे. आता जम्मू-काश्मीरमध्ये ११४ जागा आहेत. त्यापैकी २४ जागा पाकव्याप्त काश्मीरमध्ये येतात. अशा प्रकारे केवळ ९० जागांवर निवडणूक होणार आहे. ९० पैकी ४३ जागा काश्मीर विभागात, तर ४७ जागा जम्मू विभागात गेल्या आहेत. यापूर्वी केवळ ८७ जागांवर निवडणुका झाल्या होत्या.

### जम्मू-काश्मिरमध्ये १० वर्षांनंतर निवडणूक होणार

जम्मू आणि काश्मिमधील ३७० कलम हटवल्यानंतर त्या ठिकाणी कोणतीही निवडणूक घेण्यात आली नव्हती. आता १० वर्षांनंतर त्या राज्यात निवडणूक होणार आहे. जम्मू-काश्मिरमधील निवडणुका घ्या अशी मागणी तिथल्या राजकीय पक्षांनी केली होती. त्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केली होती. त्यानंतर ३० सप्टेंबरपूर्वी निवडणुकीचा निर्णय घ्या, त्याचे नियोजन करा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले होते.

## विद्यार्थ्यांना पीएमपी बसपासमध्ये ७५ टक्के सवलत मिळणार

पिंपरी : पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीच्या हद्दीत कोणत्याही शाळेत जाण्यासाठी पीएमपीएमएलमार्फत सवलतीचा पास देण्यात यावा, अशी मागणी भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे केली होती. त्याची दखल घेत महापालिका प्रशासनाने आपल्या हद्दीतील पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना बसपासमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. आता विद्यार्थ्यांनी बसपाससाठी केवळ २५ टक्के रक्कम भरावयाची आहे. भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील हजारो विद्यार्थ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.






सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वक्ता विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी संदीप गाडेकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार लोकनेते अरविंदराव चव्हाण शिफारशीवरून आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय खासदार सुनील तटकरे साहेब यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस वक्ता प्रशिक्षण विभागाचे प्रदेश अध्यक्ष मा.सुशील शेळके यांनी वक्ता विभागाचे जालना जिल्हाध्यक्ष म्हणून संदीप गाडेकर यांची नियुक्ती केली. महिला व बालविकास मंत्री अदिती ताई तटकरे यांच्या शुभहस्ते गाडेकर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. आपणास दिलेली जबाबदारी आपण कर्तव्यपुर्वक पार पाडून व येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ध्येय धोरण जालना जिल्ह्यातील खेड्या पाड्यात पोहचविण्यासाठी सदैव तत्पर रहावे. छत्रपती शिवराय, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारधारेचा प्रचार व प्रसार करून पक्ष वाढीसाठी आपल्या भागात काम करावे असे नियुक्ती पत्रात म्हटले आहे. या कार्यक्रमाला युवकांचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, वक्ता विभाग मराठवाडा कार्याध्यक्ष सय्यद इरफान, वक्ता विभाग परभणी जिल्हाध्यक्ष सुरेंद्र रोडगे ,वक्ता विभाग नांदेड जिल्हाअध्यक्ष चेतन पाटील, राष्ट्रवादी विद्यार्थी आघाडी जालना जिल्हाध्यक्ष श्री कृष्णा गाडेकर, सहकारी महादेव गाडेकर, विष्णू गाडेकर, पवन गाडेकर यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

# बहिणीची राखी पौर्णिमा तर शेतकरी भावांचा जिव्हाळ्याचा बैलपोळा आनंदात होणार –आ.लोणीकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र सरकारची महत्त्वकांक्षी योजना मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेचे परतूर मंठा विधानसभा मतदारसंघातील महिलांचे ७४ हजार २८२ अर्ज ऑनलाईन करण्यात आलेले असून परतुर तालुक्यामध्ये ३५ हजार ९९४ तर मंठा तालुक्यात ३० हजार ४४८ तर जालना ग्रामीण मधील ७८४० असे अर्ज ऑनलाईन झालेले असून या सर्व महिलांना मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी या योजनेचा लाभ मिळण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असल्याची आमदार बबनराव लोणीकर यांनी सांगितले, ते परतुर येथे मुख्यमंत्री माझी बहीण लाडकी या योजनेतील लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंद करणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच ग्रामसेवक अंगणवाडी सेविका ऑपरेटर व पूरक यंत्रणांचा सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते

पुढे बोलताना ते म्हणाले की, परतूर मंठा विधानसभा क्षेत्रातील अंगणवाडी सेविका ग्रामसेवक, सरपंच उपसरपंच आशा सेविका यांनी या मोहिमेत उत्कृष्ट काम केले असून यासंदर्भात आपण परतुर व मंठा येथे कार्यशाळा घेऊन प्रशिक्षण प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर या सर्व यंत्रणांनी गावागावात ग्रामपंचायत कार्यालयात बसून या योजनेतील फॉर्म ऑनलाईन करून घेतले त्यामुळेच हा विक्रमी आकडा आपल्याला गाठता आल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदार संघात झालेल्या विक्रमी नोंदीमुळे आपण समाधानी असून या यंत्रणा सोबतच भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी ही या कामात हिररी ने भाग घेत योजनेचा लाभ थेट शेवटच्या महिलेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केल्याचे सांगितले. या सर्व प्रक्रिया संदर्भामध्ये आपण वेळोवेळी सर्वच यंत्रणांशी संपर्क ठेवून होतो त्यामुळेच अशक्यप्राय वाटणारी गोष्ट शक्य होऊ शकली असेही यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले. बोलताना ते म्हणाले की बहिणीची राखी पौर्णिमा शेतकरी भावा च्या बैलाचा सण पोळा हा दणदणीत होईल असे यावेळी बोल-ताना त्यांनी नमूद केले. यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर, विधानसभा निवडणूक प्रमुख गणेशराव खवणे भाऊसाहेब गोरे भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले पंजाबराव बोराडे प्रसाद बोराडे विलास घोडके आनंद जाधव परतुर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संभाजी वारे आष्टी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती रवींद्र सोळंके, बद्रीनारायण ढवळे पंचायत समिती सदस्य शिवाजी पाईकराव, शेषनारायण दवणे माऊली गोंडगे कैलास चव्हाण विकास पालवे युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बंडू मानवतकर, कृ उ. बा समिती परतूर चे संचालक पद्माकर कवडे गजानन लोणीकर मेराजुद्दीन खतीब, नागेश ढवळे नागेश घारे अमोल मोरे तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, नायब तहसीलदार श्री काळदाते महिला व बालकल्याण अधिकारी श्री कोळेकर, मंठा महिला व बालकल्याण अधिकारी घोडके गटविकास अधिकारी राजेश तांगडे मंठा गट विकास अधिकारी गगनबोणे सरपंच मधुकर मोरे, किरण अंभोरे, पिंटू काका ढवळे, सिद्धेश्वर मगर, ग्रामसेवक संघटनेचे मंठा तालुकाध्यक्ष नरेंद्र पवार संगणक परिचालक संघटनेचे पानसंबळ श्री भरत कवळे तानाजी शेंडगे नरेंद्र ताठे बाबाजी जाधव जानकीराम चव्हाण सचिन राठोड प्रसादराव गडदे प्रकाश गडदे प्रकाश गबाळे गुलाब राठोड बाळासाहेब काळे आबासाहेब सरकटे जितेंद्र सरकटे प्रल्हाद सरकटे अंकुश राठोड विनोद जाधव गजानन शिंदे कृष्णा खंदारे नितीन साठे दीपक दवणे परमेश्वर शिंदे प्रकाश मोरे सचिन राठोड सतीश लोमटे सोपान वायाळ दत्ता खराबे बाळासाहेब इंगळे विठ्ठल राठोड प्रभाकर हजारे राजीव करावे सुभाष बागल बंडू नाना खरात इंद्रजीत मगर अरुण उबाळे कपिल तिवारी भागवत डोंगरे यांच्यासह मोठ्या संख्येने अंगणवाडी सेविका ग्रामसेवक सरपंच ग्रामपंचायत सदस्य ऑपरेटर आशा सेविका यांची उपस्थिती होती

## संक्षिप्त

### मंठा बाजार समितीमध्ये सभापती ए.जे.बोराडे यांच्या हस्ते ध्वजारोहण



**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्ट रोजी येथील बाजार समितीमध्ये सभापती ए जे बोराडे यांच्या हस्ते सकाळी ८ : २५ वाजता ध्वज-ारोहण करण्यात आले. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक अण्णासाहेब खंदारे, संतोष वरकड, प्रल्हादराव बोराडे, वैजनाथ बोराडे, दत्तप्रसाद बनसोडे, प्राचार्य सचिन राठोड, बाबाराव राठोड, केशव महाराज सरकटे, मुस्तफा पठाण यांच्यासह अंकुशराव अवचार, भारतसेठ बोराडे,बालासाहेब बोराडे, जे.के. कुरेशी,अच्युतराव बोराडे, प्रदीप बोराडे, उबेद बागवान, बाजखान पठाण, अरुण वाघमारे, सिराजखान पठाण, कयूमभाई कुरेशी, मुसाभाई कुरेशी, शबाब भाई कुरेशी, सगीर पठाण, शेख इजाजोद्दीन, पप्पू दायमा, मारोतराव बोराडे, रंजीत दांगट, बाळू जोशी, गणेश सराफ, विलास उन्हाळे, लक्ष्मण बोराडे, बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे, बालाजी कुलकर्णी, शिवाजी छानवाल, श्याम हजारे, रावसाहेब मोरे, अजय जाधव,शेख वाजिद, किरण गोरे, संभाजी बोराडे यांची उपस्थिती होती.

### 'स्वातंत्र्य' हा सर्वात मौल्यवान शृंगार – डॉ.भानुदास कदम



**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधि**

मानवी जीवन स्वातंत्र्यामुळे समृद्ध बनवता येते, जीवनाला दिशा मिळते,स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे, स्वातंत्र्य हा सर्वात मौल्यवान शृंगार आहे असे प्रतिपादन आनंद प्राथमिक माध्यमिक व आनंद इंग्लिश स्कूल परतूर येथे ध्वजारोहण प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.भानुदास कदम यांनी केले.

७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यालयामध्ये तीन दिवस ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.रांगोळी स्पर्धा, चित्रकला, कलाकृती निर्माण करणे,अशा उपक्रमांत विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला.तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य एकनाथ कदम, उपाध्यक्ष डॉ भानुदास कदम यांच्या हस्ते करण्यात आला. स्वातंत्र्यदिनी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.भानुदास कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचे महत्त्व विशद केले.यावेळी विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेसह भारताची विविधतेतील एकता आपल्या सादरीकरणातून दाखवली. बालवाडीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या निरागस सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी मुख्याध्यापिका श्रीमती सत्यशीला तौर, मुख्याध्यापक संजय कदम, इंग्लिश स्कूलचे प्रिन्सिपल नारायण सागुते व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### लाडक्या बहिणींचे योजनेचे पैसे काढण्यासाठी बँकेत गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**परतुर: प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने नुकतेच सुरू केलेल्या लाडक्या बहिणी योजना अंतर्गत स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येलाच लाडक्या बहिणीच्या खात्यामध्ये ३००० रुपये पोहोचल्याचे धडाधड मेसेज मोबाईल वर येतात आज सुट्टीनंतरच्या पहिल्या दिवशी संपूर्ण बँकेत भगिनींची मोठी गर्दी पहावयास मिळाली सकाळी नऊ वाजल्यापासून बँकेत खात्यावरील पैसे काढण्यासाठी गर्दी होती तर शहरातील बँक सेवा केंद्रामध्ये महिलांनी मोठी गर्दी केलेली होती सदरील योजना फसवी असल्याच्या चर्चेमध्ये बऱ्याच महिलांनी लाडकी बहीण योजनेत फॉर्म भरले नव्हते शेजारील महिलांच्या व मैत्रिणींच्या खात्यामध्ये धडाधड ३००० रुपये आल्याचे कळताच फॉर्म भरलेल्या बहिणींनी ही सेवा केंद्र गाठून आपल्या कागदपत्राची जुळवणी करत फॉर्म भरण्यास गर्दी केली एकूण आज संपूर्ण शहरात बँकेत व सेवा केंद्रावर महिलांची तोबा गर्दी होती.

# धारकल्याण गावच्या विकासासाठी निधीची कमतरता येणार नाही–अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

धारकल्याण गावच्या चौफेर विकासासाठी विविध आपण सतत प्रयत्नशील असून विकासकामाना निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही असे शिव-सेना नेते अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले .आज १६ ऑगस्ट २०२४ रोजी धारकल्याण येथे पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते, तालुकाप्रमुख भगवानराव अंभोरे, माजी सभापती पांडुरंग डोंगरे. युवासेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, शैलेश घुमारे, उपजिल्हाप्रमुख गणेश मोहिते, माझी जि प सदस्य सुधाकर वाडेकर,शिवसेना तालुका समन्वयक कडूबा इंदलकर, युवासेना तालुका प्रमुख राहुल गवारे ,बाळासाहेब पाचरणे, विठ्ठल टेकाळे, सचिन देशमुख ,, वैजनाथ कावळे ,सोप-ानराव कावले,ज्ञानेश्वर माऊली उबाळे , भरत उबाळे आदी मान्यवर होते .पुढे बोलताना खोतकर म्हणाले की आपण धारकल्याण गावासाठी मुख्य रस्ता, पाणीपुरवठा योजना ,गावातील अंतर्गत रस्ते, सदानंद महाराज मठावरील विकास कामे, ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधकाम, आनंदवाडी साठी रस्ता दुरुस्ती, अंतर्गत सिमेंट रस्ते, सभागृह बांधकाम, इत्यादी कामे केलेली असून उर्वरित गावातील विकास कामे देखील केले जातील यासाठी आपला पाठपुरावा चालू असून लवकरच ही कामे देखील पूर्ण होतील .या कामासाठी निधी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यात येईल. या कार्यक्रमांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यावर जमा झाल्यामुळे गावातील लाभार्थ्यी महिलांनी शिवसेनेचे उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.व मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेबांचे व खोतकर यांचेआभार मानले व त्यांना धन्यवाद दिले.युवकांचा युवासेनेत प्रवेशया कार्यक्रमादरम्यान धारकल्याण गावातील अनेक युवकांनी युवासेनेत अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवेश केला .यामध्ये उध्दव भुतेकर, ज्ञानेश्वर उगले ,पांडू पवार, आदिनाथ घोडके, ऋषिकेश उगले पवन भुतेकर नारायण उगले, बालाजी ताटे,पवन भुतेकर,सत्यम इंगोले, शिवप्रसाद घोडके, दीपक राऊत, शहाजी राजे ,गोरख चव्हाण, विनायक खोतकर, योगेश खोतकर, मोहन भुतेकर ,श्रीकांत उगले, वैभव उगले ,दीपक घोडके, भागवत कांबळे ,आदींचा समावेश असून या सर्वानी युवासेनेत प्रवेश ऊकेल्यामुळे शिवसेना उपनेते नेते अर्जुनराव खोतकर यांनी स्वागत केले. यावेळी गावातील सरपंच किशोर कदम, युवा सेनेचे प्रमुख प्रमोद वाघमारे, उपतालुकाप्रमुख बंडु राजे ,गणेश भुतेकर, सदानंद उगले ,आप्पासाहेब उगले, आप्पासाहेब घोडके, रामजी दराडे ,सकाजी खरात, दिनकर दराडे, चंद्रकांत साबळे ,उद्धव इंगोले ,संदीप इंगोले ,भीमराव ढोबळे ,भीमराव पिठोरे, बबन खरात, सुदाम इंगोले, आधी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना : बँक खात्याशी आधार लिंक करण्याचे सतिश घाटगेंचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बही उच्चण योजनेच्या विधानसभा मतदारसंघ क्षेत्राच्या समितीवर सतीश घाटगे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर या समितीची पहिली बैठक १५ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालयात पार पडली. सतीश घाटगे यांनी या बैठीकीत ३३ हजार ८५१ महिलांचे अर्ज मंजूर केले आहे.

महायुती सरकारने आर्थिक दुर्बल घटकांतील महिलांना आधार देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरु केली आहे.या योजनेचा लाभ शेवटच्या गरीब महिलापर्यंत पोहोचविण्यासाठी शासनाने विधानसभा क्षेत्रनिहाय समिती तयार केली आहे.त्यानुसार घनसावंगी विधानसभेच्या समितीच्या अध्यक्षपदी समृद्धी कारखान्याचे चेअरमन तथा भाजप नेते सतीश घाटगे पाटील यांची यांची शासनाने निवड केली आहे. स्वातंत्र्यदिनी तहसील कार्यालयात सतीश घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत घनसावंगी विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातून ३५ हजार ५९३ महिलांचे अर्ज आले होते. त्यापैकी ३३ हजार ८५१ अर्जांना सतीश घाटगे यांनी तत्काळ मंजुरी दिली आहे. मंजुरी मिळालेल्या महिलांना ३ हजार रुपये त्यांच्या आधार लिंक खात्यावर जमा होणार आहे. नव्याने अर्ज केलेल्या महिला लाभार्थींचे अर्ज मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पोर्टलवर गतीने अपलोड करून सर्व महिलांचे अर्ज मंजूर करण्याच्या सूचना तालुका प्रशासनास सतीश घाटगे यांनी दिल्या. एकही पात्र महिला भगिनी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही. यांची काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

या बैठकीस तहसीलदार योगिता खटावकर, गट विकास अधिकारी अमित कदम, मुख्यधिकारी डी. यु. भांबरे, समितीचे सदस्य रवींद्र तौर, तात्यासाहेब चिमणे, विनोद दाभेराव, शिवाजीराव कंटूले, रामेश्वर गरड, विष्णुपंत जाधव, किसान कोरडे लक्ष्मण कंटूले, राजकुमार उगले, आत्माराम मोरे, अनुमंत अर्दड, महादेव चिमणे आदी उपस्थित होते.

अनेक महिलांचे बँक खाते आधार सोबत लिंक केलेले नाही. त्यामुळे त्यांना लाडकी बहिण योजनेचे पैसे मिळाले नाही. ज्या महिलांचे खाते लिंक नाही. त्यांनी तातडीने आपले खाते आधार सोबत लिंक करण्याचे आवाहन सतीश घाटगे यांनी दिले आहे. अर्ज केलेल्या प्रत्येक लाभार्थीचे अर्ज मंजूर होणार आहे. चुकीच्या अफवावर विश्वास ठेवू नये असेही आवाहन त्यांनी केले आहे.

# जो आई वडिलांची सेवा करतो त्याचे धन्य माता – पिता तया चिया या जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या अभंगा प्रमाणे सर्वांनी वागावे– हभप शिवलिलाताई पाटील



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

तालुक्यातील वालसावंगी येथे मा श्री राजाभाऊ देशमुख मित्रमंडळ भोकरदन- जाफ्राबाद द्वारे आयोजित काँगेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त कीर्तन सोहळ्यानिमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार हभप शिवलिलाताई पाटील यांनी कीर्तनासाठी जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा अभंग आपुलिया हिता जो असे जागता ! धन्य माता पिता तया चिया ! कुळी कन्या पुत्र होती ती सात्विक! तयाचा हरिख वाटे देवा ! गीता भागवत करिती श्रवण! अखंड चिंतन विठोबाचे! तुका म्हणे मज घडो त्याची सेवा! तरी माझ्या दैवा पार नाही!! या अभंगाच्या निरुपम प्रसंगी शिवलिलाताई महाराज म्हणाल्या की तुम्ही फक्त एकच काम करा आपल्या वयोवृद्ध आई वडिलांची सेवा करा त्यांची सेवा म्हणजेच ईश्वर सेवा आहे, आजकालच्या मुली बाबत त्या म्हणाल्या की तुम्ही काही चांगल काम नाही तरी चालेल परंतु आपल्या आईवडिलांची मान शरमेने कधीच खाली होईल असे वागु नका असे त्या आपल्या कीर्तनात म्हणाल्या.

यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, मा नगराध्यक्षा मंजुषाताई देशमुख, प्रियाताई देशमुख,संगीता फुसे,प्रतीक देशमुख, इंद्रजीत देशमुख हभप विष्णु महाराज सास्ते,मा जि प सदस्य शंकर भुते, शिवसेनेचे सुभाष राऊत, संदिप लोखंडे,तुकाराम फुसे,नारायण हिवाळे,सचिन जाधव,संतोष माळोदे,राहुल कोळेकर,कपिल भुते,दिपक भुते, पत्रकार विशाल अस्वार,हरिदास गवळी,मनीष अस्वार,मिलींद साळवे,नारायण हिवाळे,कौतिक हिवाळे,अमोल फुसे,प्रभाकर तळेकर, राम देशमुख, दादाराव देशमुख,राहुल देशमुख, रमेश जाधव, सोपान सपकाळ, रामचंद्र गायके,रोषण देशमुख यांच्यासह टाळकरी,भजनी मंडळ व भाविक भक्त व गावकरी यांची उपस्थिती होती.

## राज्यातील पहिल्या वस्तीगृहाचे मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन

# इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने राज्यात ७२ वस्तीगृहांची करण्यात येणार उभारणी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्याव-तीने राज्यात ७२ वस्तीगृहांची उभारणी करण्यात येणार आहे. त्याचाच भाग म्हणून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत गृहनिर्माण आणि इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा जालना जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते पहिल्या वस्तीगृहाचे जालना येथे उद्घाटन करण्यात आले.

ग्रामीण भागातील मुला-मुलींची शहरात शिक्षण घेत असताना राहण्याची अडचण निर्माण होवू नये यासाठी राज्य सरकारच्या वतीने राज्यातील ३६ जिल्ह्यात प्रत्येकी २ वस्तीगृह तयार करण्यात येत आहे. यात १०० मुले आणि १०० मुली यांना राहण्यासाठी या वसतिगृहाचे उपयोग होणार आहे. स्वातंत्र्य दिवसाचे औचित्य साधून गुरुवारी जालना येथे पहिल्या वस्तीगृहाचे उद्घाटन पार पडले. ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या मुला मुलींची निवासाची व्यवस्था करण्यात आली असल्याने यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये याचा निश्चितच खूप मोठा उपयोग होईल, असे प्रतिपादन यावेळी मंत्री श्री अतुल सावे यांनी केले. पुढे बोलतांना मंत्री अतुल सावे म्हणाले की, वस्तीगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, विविध भत्ते, ग्रंथालय अशा विविध सुविधा पुरवण्यात येणार आहे. अशा या सर्व सुविधा युक्त असलेल्या या वस्तीगृहात जास्तीजास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा तसेच ज्यांना प्रवेश मिळणार नाही अशांना सावित्रीबाई फुले आधार योजना आणि स्वयंम योजनेच्या माध्यमातून प्रवेश देण्यासाठी विभागाच्यावतीने प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी खासदार कल्याण काळे, आमदार कैलास गोरंट्याल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, समाजकल्याणचे प्रादेशिक उपायुक्त जलील शेख यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## जाहीर प्रगटन

दि १६/८/२०२४ शनिवार मी शिवकन्या उमराव चौरे माझी अंबड तालुक्यातील महाकाळ शिवरात गट क्रमांक न.१३ मध्ये ६ आर जमीन असून ती कोणत्याही खरेदीने दिलेले नाही तसेच ते कोणाला घाणखत करून दिलें नाहीं ती पुर्ण अद्यावत माझ्या ताब्यात व मालकी हक्कात आहे.

## अग्रलेख...

# स्वातंत्र्य दिन चिरायु होवो

१५ ऑगस्ट २०२४ भारताचा स्वातंत्र्य दिन. या दिवशी आपल्याला इंग्रजांच्या दुष्चक्रातून स्वातंत्र्य मिळाले. आपल्यासोबत पाकिस्तानही स्वतंत्र झाला. यंदाचा हा भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन. एखाद्या स्वतंत्र देशाचा विचार करता ७०-८० वर्षे म्हणजे फारशी होत नाही. पण आपण या कालावधीत केलेली प्रगती एका स्वतंत्र राष्ट्राच्या इतिहासाच्या दृष्टीने पुरेशी म्हणायला हरकत नाही. भारतावर अनेक दशके ईस्ट इंडिया कंपनी आणि ब्रिटिशांचे राज्य होते. ब्रिटिश काळात भारतीयांवर झालेले अत्याचार आपल्यातील जुन्या जाणत्यांनी अनुभवले आहेत. त्यावेळी भारताला 'सोने की चिडीया' म्हटले जाई. काँग्रेसच्या नेतृत्वात स्वातंत्र्याची चळवळ उभी झाली आणि विकसित होत गेली. या चळवळीच्या जोडीला क्रांतिकारकांच्या फौजादेखील उभ्या झाल्या. अनेक स्वयंसेवी संघटनांनी स्वातंत्र्यासाठी सज्ज झाल्या. काँग्रेस कार्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे इंग्रजी पोलिसांच्या लाठ्या-काठ्या खाल्ल्या, त्याचप्रमाणे क्रांतिकारकांनीही या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलने केली आणि प्रसंगी कारागृहात जाण्याचा मार्गही पत्करला. अहिंसेचा मार्ग निवडलेल्या कार्यकर्त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले. पण अहिंसेचा मार्ग अमान्य असलेल्या क्रांतिकारकांनी गुप्तपणे शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण घेतले आणि इंग्रज अधिकाऱ्यांच्या हत्या घडवून सर्वत्र देशप्रेमाची भावना वृद्धिंगत केली. काँग्रेसची चळवळ आणि क्रांतिकारकांच्या गनिमीकाव्यामुळे अखेर इंग्रजांना भारत सोडून जावे लागले. देश स्वतंत्र झाला आणि एक नवी पहाट बघण्याचा योग भारतीयांना आला. त्याच स्वातंत्र्य दिनाला आज ७८ वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याचा पहिला ध्वज पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी फडकवला आणि या देशाला अंधकाराच्या गर्तेतून बाहेर काढण्याचा निर्धार केला. आज आपण ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करण्यासाठी सज्ज झालो आहोत; ज्याचा प्रारंभ देशाची राजधानी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यापासून होणार आहे. यानंतर त्यांचे बहुप्रतीक्षित सलग ११ वे स्वातंत्र्य दिनाचे भाषण होईल. या वर्षासाठी भारताच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'विकसित भारत' अशी आहे. ही थीम २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्रात रूपांतरित करण्याची सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित करणारी आहे.

देशाच्या संसदेत सध्या रणकंदन चाललेले दिसायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर कुरघोड्या करताना दिसत आहेत. वक्फ बोर्ड पुनर्रचना कायदा, आरक्षणातील क्रिमीलेअर, समान नागरी संहिता, विभिन्न राज्यांना निधीचे वाटप, अग्निवीर योजना, बांगलादेशातील अस्थिरता, पाकिस्तानमधील अनागोंदी आणि श्रीलंकेची रसातळाला जात असलेली अर्थव्यवस्था आदी मुद्यांवर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात मनभिन्नता दिसत आहे. भारतीय निवडणुकांमध्ये जॉर्ज सोरोस यांचा वाढता रस, अर्बन नक्षल, विभाजनकारी डावे आणि अनिर्बंध स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते असलेले लिबरल्स सरकारवर कुरघोडी करण्याचा मोका सोडायला तयार नाहीत. स्वयंसेवी संस्थांच्या नावाखाली अनेकांचा गोंधळ माजवण्याचा प्रयत्न सुरू आहे. सुदृढ लोकशाहीसाठी मतभेद आवश्यकच आहेत. पण या साऱ्या मतभेदांच्या वर उठून तिरंग्याच्या नावाखाली उभय पक्षांचे लोकप्रतिनिधी एकत्र येऊ शकतात. या तिरंग्याच्या उत्सवानिमित्त सरकारने 'हर घर तिरंगा' अभियान हाती घेतले आहे. त्यात आपण साऱ्यांना मतभेद विसरून सामील व्हायला हवे. भारतमातेचा जयजयकार करायला हवा आणि 'वंदे मातरम्'च्या घोषणाही द्यायला हव्यात. देशाच्या झेंड्याबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी पुढे येण्यापासून कोणीच कोणाला रोखू शकत नाही. कारण हा ध्वज स्वातंत्र्याचा आहे... तो पारतंत्र्याची श्रृंखला मोडणारा आहे... देशाला प्रगतीच्या मार्गावर नेणारा आहे. याच दिवशी देशवासीयांना संविधानाचे रक्षण करण्याची सामूहिक शपथ घ्यायची आहे. हा दिवस एकमेकांमधील वाद मिटवून शुभेच्छा देण्याचा आहे. परस्परविरोधी पक्षांच्या सदस्यांनी सहमतीने निर्णय घेऊन तोडगा काढण्याचा संकल्प करणारा हा दिवस आहे. स्वातंत्र्यानंतरची राज्यकर्त्यांची पहिली १० वर्षे एकूणच लोकशाहीची व्यवस्था काय, हे समजून घेण्यात गेली. त्यानंतरच्या १० वर्षांत देशावर युद्धे लादली गेली. त्यातून आपण सहीसलामत बाहेर पडलो, पण त्यात झालेले अपरिमित नुकसान भरून काढण्यास बराच कालावधी लागला. त्यानंतरच्या दशकात भारताला आणिबाणीचा सामना करावा लागला. ही १० वर्षे लोकतंत्र वाचवण्याच्या कामात गेली. चौथ्या दशकात भारत प्रगतीबाबत काही ठोस बोलू शकला. त्या काळात विकासाच्या बऱ्याच योजना आल्या आणि देशात चहलपहल दिसून आली. त्यानंतरचा काळ गॅट करारासाठीचा कोलाहलात तसेच खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर तोडगा काढण्यात गेला. त्यानंतरच्या काळात बरीच स्थित्यंतरे घेऊन गेली. याच काळात अल्पावधीच्या सरकारांचीही चव भारतीयांनी चाखली. वाजपेयींच्या काळात पहिले गैरकाँग्रेस सरकार स्थापन झाले. त्यानंतरच्या १० वर्षांत मनमोहनसिंग यांचे धोरणलकव्याचे सरकार आपण पाहिले. पण मोदींच्या काळात भारताने खऱ्या अर्थाने प्रगती अनुभवली. गेल्या १० वर्षांतील भारताची प्रगती उल्लेखनीय आहे. पंतप्रधान मोदी निवडून आले, तेव्हा भारत ही जगातील दहावी अर्थव्यवस्था होती, त्यानंतर ती पाचवी अर्थव्यवस्था बनली आणि लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली आहे. जागतिक महामारी अनुभवण्याचा काळही हाच होता. त्यावेळी भारताने ही परिस्थिती अतिशय कुशलतेने हाताळून हा देश कुठल्याही परिस्थितीत आपली काळजी घेण्यास समर्थ असल्याचे जगाला दाखवून दिले. त्या परिस्थितीत आपण सुमारे शंभरावर देशांना लसी आणि कोरोनाशी लढणारी औषधे पुरवून आपल्या मानवतावादी स्वभावाचा जगाला परिचय करून दिला. स्वातंत्र्याचा खरा अर्थ आपल्याला १९४७ मध्ये कळला, पण स्वातंत्र्याची ताकद काय असू शकते, याची प्रचीती २०१४ नंतरच आली. पाकिस्तानवर केलेला सर्जिकल स्ट्राईक हा आपली ताकद आजमावणारा होता. चीनला दिलेली टक्कर 'हम किसी से कम नहीं' हे दाखवून देणारी होती. आपल्या देशातील तरुणाईची ताकद ओळखून त्यांच्यासाठी नवनवे उपक्रम राबविण्याचाही काळ २०२४ नंतरचाच होता. भारताने आता नवतंत्रज्ञान स्वीकारले आहे. आपण वित्तीय प्रणाली, बँकिंग प्रणालीचे डिजिटलायझेशन पाहत आहोत. ते डिजिटलायझेशन, ती प्रगती, ते तंत्रज्ञान लहान शहरे, खेड्यापाड्यांत पोहोचले आहे. त्यामुळे भारतात क्रांती होत आहे. भारताने राबविलेल्या अनेक योजना आज विदेशातील लोकांसाठी आदर्श ठरत आहेत. त्यासाठी त्यांची भारताकडे विचारणा होत आहे. निवडणूक आयोगाचे काम जगातील लोकशाहीवादी देशांसाठी एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून पुढे आले आहे. निवडणुकीच्या ईव्हीएमचा सुरू केलेला वापर केवळ नवतंत्रज्ञान स्वीकारणारा प्रयोग नसून त्याद्वारे निवडणुकीतील गैरप्रकारांना बराच आळा बसला आहे. गेल्या १० वर्षांतील मोदींची लाल किल्ल्यावरची भाषणे देशाला दिशा देणारी ठरली आहेत. मोदींनी विविध देशांशी संपर्क प्रस्थापित करून, भारतीयांच्या मुत्सद्देगिरीची कामगिरी जगापुढे मांडली आहे. हे सरकार त्यांनी केलेल्या कामाचे ऑडिट करणारेही आहे. आपातकालीन परिस्थितीत गरजूंच्या मदतीला धावून जाण्याचा एक विक्रमच या सरकारने प्रस्थापित केला आहे. जनधन योजनेतून लक्षावधी नागरिकांना बँकिंग प्रणालीशी जोडण्याची अद्वितीय कामगिरी या सरकारने केली आहे. अग्निवीर योजनेतून देशातील तरुणांना राष्ट्रप्रतीच्या जबाबदारीची जाणीव करून देणारे तसेच युवकांच्या रोजगारासाठी झटणारे म्हणूनही या सरकारची ओळख आहे. ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा करीत असताना विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी सहमतीने काम करण्याचा संकल्प केल्यास प्रगतीमधील उरल्यासुरल्या बाधाही दूर होतील, असा विश्वास व्यक्त होत आहे. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झेंडा उंचा रहे हमारा' या गौरव गीतानुसार व्यवहार करण्याची शपथ घेऊ या!

## इतस्ततः

### डॉ. विवेक राजे

# बांगला देश...

मार्टिन लुथर किंगचे एक प्रसिद्ध वाक्य आहे, 'जी संस्कृती किंवा राष्ट्र मनाने घाबरट/मृदू स्वभावाची माणसे जन्माला घालते ती संस्कृती/राष्ट्र स्वतःचा सांस्कृतिक मृत्यू हप्त्यांवर विकत घेत असते...' कदाचित किंग यांना घाबरट वा मृदू स्वभावाचीच माणसं भेटली असतील. कारण निडर किंवा कणखर माणसे आणि घाबरट किंवा मृदू स्वभावाची माणसे असे पाश्चात्त्य विचारपद्धतीप्रमाणे दोन परस्परविरोधी टोकं सांगून मार्टिन लुथर किंग मोकळा झाला. त्याला कणखर असूनही माणसं जिवंतपणी डोळ्यांवर कातडं ओढून घेऊ शकतात किंवा आपल्या पूर्वजांनी दिलेल्या वारसा, आपल्या अवतीभोवती वर्तमानात घडत असलेल्या घटना आणि भविष्यात येऊ घातलेल्या आपल्या पिढ्यांचे सन्मानित अस्तित्व या तीनही बाबतीत, टोकाची बेपर्वा वा उदासीन असू शकतात, ही तिसरी शक्यता लक्षात आली नसावी. कारण, तो भारतात कधी आलाच नव्हता. माणसं बेपर्वा किंवा उदासीन असतात याचा अर्थ ते कणखर नसतात किंवा कणखर लढवय्ये होऊच शकत नाहीत असा नाही. उलट कणखर लढवय्येपणाचा वारसा आणि तत्त्वज्ञान त्यांनाही मिळालेले असते. त्यांना ते तत्त्वज्ञान माहिती असते; पण ते कृतीत आणण्याची त्या माणसांची इच्छा नसते. कारण डोळ्यांवर ओढलेल्या कातड्यामुळे त्याची कृती करण्याची इच्छाशक्ती संपुष्टात आलेली असते, हेच खरे. हे सगळं मांडण्याचे कारण आमचा शेजारी बांगलादेशमध्ये मागील काही दिवसांपासून घडत असलेल्या घडामोडी होत. काही विद्यार्थी कुठल्यातरी मुद्यावरून आंदोलन करतात आणि ते वाढत जाऊन शेवटी त्या देशातील संपूर्ण राजकीय व्यवस्था उलथून पाडली जाते. या प्रकारचे एक आंदोलन सुमारे ३०-३५ वर्षांपूर्वी चीनमध्ये घडले. पण चीनच्या साम्यवादी सरकारने निष्ठूरपणे निःशस्त्र विद्यार्थी आंदोलकांवर रणगाडे घालून हे आंदोलन चिरडून टाकले. पण मध्य पूर्वेत आणि इतरत्र झालेल्या आंदोलनांनी मात्र व्यवस्था उलथून टाकण्याची कामगिरी चोख बजावली. परिणामतः याचे एक स्टॅण्डर्ड टूल किट, कार्य पद्धती अस्तित्वात आली. आता जगातील विभिन्न शक्ती आपले ईप्सित साध्य करण्यासाठी या कार्य पद्धतीचा प्रछन्न वापर करू लागल्या. बांगलादेशात हे टूल किट वापरत जगातील काही परस्पर विरोधी हितसंबंध असलेल्या शक्तींनी उलथापालथ घडवून आणत तेथील लोकशाही व्यवस्था उलथून टाकली. निर्माण केलेल्या/झालेल्या परिस्थितीचा फायदा घेऊन मग तेथील बहुसंख्य असलेल्या मुस्लिम समाजाने आपली मूळ हिंसक वृत्ती दाखवत तेथील अल्पसंख्यक हिंदूंवर अत्याचार करण्याची आपली तहान भागवून घेतली. अशा प्रत्येक प्रसंगी मृदू, घाबरट आणि डोळ्यांवर अहिंसेच्या नेभळ्या तत्त्वज्ञानाचे कातडे ओढून घेतलेल्या, असंघटित, गाफील, मूर्ख हिंदू समाज नेहमीच मार खातो, हा इतिहास आहे.

आंदोलनाला असामाजिक तत्त्वांनी हातात घेतल्यानंतर पोलिस दल हतबल झाले होते. बांगलादेशी सैन्याने जेव्हा निवडून आलेल्या शासनाची साथ देण्यास नकार दिला. पोलिस आधीच हतबल झालेले होते. कायदा सुव्यवस्था पार कोलमडून पडली होती. हीच संधी तेथील इस्लामिक गुंडांनी साधली. देशाचा मानबिंदू असलेले पंतप्रधान निवासस्थान लुटले गेले. अशा लुटीतून मिळालेल्या वस्तूंना इस्लाममध्ये 'माल-ए-गनीमत' म्हणतात. आणि इस्लाममध्ये माल-ए-गनीमत मिळवणारा माणूस चोर-लुटारू नव्हे तर भाग्यवान मानला जातो. पंतप्रधान निवासात मिळालेली स्त्रियांची अंतर्वस्त्रे झेंड्यासारखी हवेत लहरवणाऱ्या नीच आणि उन्मादी समाजाचे पंतप्रधान निवासस्थान लुटल्यानंतर पुढचे सावज अर्थातच डरपोक, असंघटित आणि शासनावर आपल्या सुरक्षेसाठी अवलंबून असणारा, संख्येने कमी आणि बेसावध असलेला हिंदू समाजच होणार होते. पण भारतातील बहुसंख्य असलेला हिंदू समाज यापासून योग्य तो धडा घेताना दिसत नाही. बांगलादेशी हिंदूंनी तर याचा विचारही केला नसेल. कदाचित आपण आणखी एका नागरी युद्धाची नांदी या देशात ऐकतो आहोत, हेच आजच्या भारतातील हिंदू समाजाला मान्य नाही. बांगलादेशमध्ये अराजक निर्माण करून, लोकशाही मार्गाने निवडून आलेले सरकार उलथून टाकण्याच्या या प्रक्रियेत जवळजवळ एक महिना सामान्य जनता भरडली जाताना दिसते. अराजकाच्या परिस्थितीत ज्या समाजाच्या हातात शस्त्र असते आणि ते चालवण्याची तयारी आणि हिंमत असते तो बाजी मारून जात असतो. हिंदू समाजाने अहिंसेचे अतिरेकी तत्त्वज्ञान झुगारून देत, व्यूहरचना करीत जर शस्त्र चालवले असते तर या देशाची फाळणी झालीच नसती. बांगलादेश आज जगभरातील हिंदूंना हेच सांगतो आहे. बांगलादेशमधील हिंदू समाज आता एकत्र येऊन आपल्या विरोधातील हिंसाचाराच्या विरोधात रस्त्यावर उतरून निदर्शने करताना दिसतो आहे. हिंदू समाज चितगाव तसेच भारतीय सीमेजवळील प्रदेशात एकत्र येतो आहे. हिंदू समाज केवळ स्वसंरक्षणाच्या उद्देशाने एकत्र आला तर सद्यस्थितीत त्याला सुरक्षितता मिळेल, हे नक्की. मात्र, त्यातून भविष्य सुरक्षित होणार नाही. भविष्यातील सुरक्षिततेसाठी वेगळी उपाययोजना करावी लागते. ती करण्यासाठी संघटित आक्रमकता धारण करावी लागेल. आज रस्त्यावर उतरून निदर्शने केल्यामुळे तेथील हिंदू समाजाला हिंसेचे लक्ष्य केले जाते आहे, याकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. पण फक्त जगाचे लक्ष वेधून घेऊन काहीही उपयोग नसतो. कारण इस्लामिक हिंसाचाराला वोक विचारसरणी नेहमीच तात्त्विक मुलामा चढवते हा गेल्या अनेक वर्षांतील अनुभव आहे. तसेच इस्लामच्या व वोकीझमच्या दबावाखाली अनेक देश आणि विचारवंत गप्प बसणे श्रेयस्कर मानताना दिसतात, हेही सत्यच आहे. त्यामुळे जगातील सर्व हिंदूंनी एकत्र येऊन, जागतिक पातळीवर निदर्शनाद्वारे आपण सगळे हिंदू म्हणून संघटित झालो आहोत, याची जाणीव जगाला तसेच इस्लामला करून देणे ही पहिली पायरी होय. पुढील पायरी आता जिथे हिंदू जनसंख्या एकूण लोकसंख्येच्या १० टक्के आहे, त्या प्रदेशात हिंदू समाजाने नियोजनपूर्वक स्थलांतर करणे हे होय. त्याचवेळी स्वतःच्या संरक्षणाची जबाबदारी घेत त्याची तजवीज केली पाहिजे. अनेक हिंदूंनी मिळेल ते साहित्य शस्त्र म्हणून जवळ बाळगणे सुरू केले पाहिजे. वेळप्रसंगी तिखटाची पूडदेखील स्वसंरक्षणासाठी परिणामकारक शस्त्र ठरू शकते, हे सगळ्यांनीच लक्षात घेतले पाहिजे. तिसरी पायरी म्हणजे जगातील सगळ्या हिंदू वस्त्यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने बांधणी करणे होय. यात हिंदू वस्तीवर होऊ शकणाऱ्या बाह्य आक्रमणाला प्रतिबंध करणे हे अभिप्रेत आहे तसेच या वस्त्यांच्या आत कोणत्याही परिस्थितीत मुसलमानांना व्यवसायासाठी, रहिवासासाठी जागा मिळणार नाही, याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. कारण हिंदू विरोधी हिंसा ही नेहमी आतून आणि बाहेरून एकाच वेळी सुरू केली जात असते. शासकीय सुरक्षा व्यवस्था किंवा पोलिस हे सगळे नुकसान घडल्यावर जागे होतात, हा जगभरातील अनुभव आहे. हिंदू तरुणांनी जगभरात एकत्र येऊन कोणत्याही आव्हानाचा प्रतिकार करण्याच्या क्षमतेचे संवर्धन करणे, ही काळाची मागणी आहे. बलोपासना आणि शस्त्र सज्जता याद्वारेच फक्त राजकीय, धार्मिक, जातीय हिंसाचारावर विजय मिळविता येतो, हे दिवसेंदिवस फक्त करीअर, पैसा आणि सुखासीनतेच्या मागे लागून डोळ्यांवर स्वार्थाचे कातडे ओढून घेऊन नेभळट/घाबरट/मृदू झालेल्या हिंदू समाजाने लक्षात घेतले पाहिजे. शेवटी मार्टिन लुथर किंगचे वरील वाक्य आणि बांगलादेशमधील घटना हेच तर सांगत आहेत.

९८८१२४२२२४

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# नगराध्यक्षांना लॉटरी!

राजकारणात कधी काहीही होऊ शकते. कधी कुणाचे स्वप्न भंगते तर कधी कुणाला लॉटरी लागते. अशीच लॉटरी राज्यातील १०६ नगराध्यक्षांना लागली आहे. राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका २०२१-२२ मध्ये झाल्या. त्यावेळी निवडल्या गेलेल्या नगराध्यक्षांचा अडीच वर्षांचा कालावधी संपुष्टात येऊन अडीच वर्षांसाठी पुन्हा नव्याने नगराध्यक्ष निवडले जाणार होते. यासाठी अनेकजण बाशिंग बांधून तयार होते. मात्र, राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. नगरपंचायत नगराध्यक्षांचा कालावधी आता अडीच ऐवजी पाच वर्षांचा केल्याने राज्यातील १०६ नगराध्यक्षांचे नशीब फळफळले असून त्यांना जणू यानिमित्ताने लॉटरीच लागली आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून अडीच वर्षांचा कालावधी पाच वर्षांचा करून हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येणार आहे. या निर्णयाने राज्यभरातील १०६ नगराध्यक्षांना मुदतवाढ मिळणार असून त्यांचा कालावधी पाच वर्षांचा झाल्याने राजकीय वर्तुळात उत्साहवर्धक वातावरण बघायला मिळत आहे. अडीच वर्षांत एखाद्या पदाधिकाऱ्याला विकास कामे करताना अनेक अडचणी येतात. याशिवाय विकासाची कामे करण्याकरिता अडीच वर्षांचा कालावधी हा कमी पडत असल्याने अनेकदा कार्यतत्पर नगराध्यक्षांना विकास कामे अर्ध्यावरच सोडावे लागत होते. पर्यायाने शहराच्या विकास कामांना खीळ बसत होती.



कुठल्याही नगरपरिषद किंवा नगरपंचायतीच्या विकास कामांचा पाठीचा कणा म्हणून नगराध्यक्षांकडे बघितले जाते. मात्र, अडीच वर्षांतच नगरपंचायतीचा कारभार दुसऱ्या नगराध्यक्षाच्या हाती सोपविला गेल्यास विकास कामे रखडली जातात आणि त्याचा फटका शहरवासीयांना भोगावा लागतो. या निर्णयामुळे आता जुनेच नगराध्यक्ष परत अडीच वर्षांसाठी सत्तेत राहिल्यास विकास कामांना नक्कीच गती मिळू शकेल. नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांचा केल्याने दुसऱ्या अडीच वर्षांसाठी अनेक जण उत्सुक होते. आपली अध्यक्षपदी वर्णी लागावी म्हणून अनेक नगरसेवक प्रयत्नरत होते. मात्र, राज्य सरकारच्या नगराध्यक्षांच्या मुदतवाढ निर्णयाने त्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले गेले आहे. एखाद्या स्वायत्त संस्थेचा प्रमुख या नात्याने सूत्रे स्वीकारल्यानंतर त्या संस्थेच्या कामाचा व इतर निर्णयाचा अभ्यास करण्यातच एक ते दीड वर्ष निघून जातात. त्यांना काही शिकता येण्याआधीच त्यांच्या पदाचा कार्यकाळ संपलेला असतो आणि त्यामुळेच अशा स्वायत्त संस्थांमधील प्रशासकीय अधिकारी पदाधिकाऱ्यांवर वरचढ होतात. अनेकदा नवीन पदाधिकाऱ्यांना अंधारात ठेवून प्रशासकीय अधिकारी आपली पोळी शेकून घेतात. त्यामुळे एखाद्या स्वायत्त संस्थेला समजून घेण्यासाठी, त्या संस्थेतील कामाचा प्रकार, जबाबदारी, शहराच्या विकासासाठी ठरणारे महत्त्वाचे निर्णय घेण्याकरिता किमान ५ वर्षांचा कालावधी असणे गरजेचे आहे, असे मत अनेक नगराध्यक्षांनी व्यक्त केले आहे. पूर्वी अशा स्वायत्त संस्थांमधील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा कालावधी हा ५ वर्षांचा असायचा. नंतरच्या काळात यात बदल करून अडीच वर्षांचा करण्यात आला. या अडीच वर्षांत अनेकांना काम करताना अडचणी येत होत्या. त्यांना त्यांचे काम समजून घेण्यातच अडीच वर्षांची मुदत संपून जात होती. त्यामुळे राज्य मंत्रिमंडळाने घेतलेला हा निर्णय अतिशय महत्त्वपूर्ण असून नगराध्यक्षांना किमान ५ वर्षांचा कालावधी मिळणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे नगराध्यक्ष निवडीच्या घोडाबाजाराला आळा बसला आहे. अडीच वर्षांनंतर आपल्या हाती सत्तेची सूत्र यावीत म्हणून अनेकदा पैशाचा वापर केला जातो. नगरसेवकांना आमिष दाखविले जाते आणि चुकीचे लोक सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करतात. मात्र आता जे नगराध्यक्ष सध्या कार्यरत आहेत तेच आता पुढील अडीच वर्षांसाठी कार्यरत राहणार असल्याने राज्यभरातील अनेक शहरातील विकास कामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नक्कीच करता येऊ शकते.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# निवडणूक जम्मू-काश्मीर विधानसभेची...

जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीची घोषणा रक्षाबंधनानंतर कोणत्याही दिवशी होऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने जम्मू-काश्मिरात ३० सप्टेंबरच्या आधी विधानसभा निवडणूक घेण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग कामाला लागला आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्यावरून निवडणूक आयोगाची नुकतीच केंद्रीय गृहसचिवांसोबत बैठक झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी २० जूनला राज्याच्या दौऱ्यावर आले असताना त्यांनी राज्यात लवकरच निवडणुका होतील, असे आश्वासन दिले होते. त्यानंतर निवडणूक आयोगाने राज्याचा दौरा करून तेथील परिस्थितीची पाहणी केली होती. परिसीमनानंतर राज्यात विधानसभा निवडणुका घेतल्या जातील, त्यानंतर योग्यवेळी या भागाला राज्याचा दर्जा दिला जाईल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत म्हटले होते. त्यामुळे आता जम्मू-काश्मिरातील विधानसभा निवडणुकीची घोषणा आयोग कधी करणार, याकडे राज्यातीलच नाही तर देशातील जनतेचेही लक्ष लागले आहे. कारण जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३५ ए आणि ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर राज्यात प्रथमच विधानसभा निवडणूक होणार आहे. आतापर्यंत काश्मीर खोऱ्यात होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना आता जम्मू भागात होत आहेत. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने निवडणूक आयोगासमोर हे मोठे आव्हान आहे. ३७० कलम रद्द करताना केंद्र सरकारने जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित भाग केले होते. जम्मू-काश्मीर मिळून एक केंद्रशासित प्रदेश तर लडाखचा दुसरा केंद्रशासित प्रदेश. जम्मू-काश्मीर विधानसभेत ९० सदस्य असून यातील ७४ जागा खुल्या श्रेणीतील तसेच ९ जागा अनुसूचित जमातीच्या तर ७ जागा अनुसूचित जातीच्या आहेत. राज्यात ८७.०९ लाख मतदार आहेत. म्हणजे प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सरासरी १ लाखापेक्षाही कमी मतदार आहेत.

अमरनाथ यात्रा संपल्यानंतर म्हणजे रक्षाबंधनानंतर राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा होईल, असा अंदाज आहे. २०१४ मध्ये राज्यात विधानसभा निवडणूक झाली होती, तेव्हापासून म्हणजे १० वर्षांत राज्यात विधानसभा निवडणूक झाली नाही. विधानसभेच्या ९० जागांसाठी चार ते पाच टप्प्यात निवडणूक होईल, असे मानले जात आहे. कारण २०१४ मध्येही पाच टप्प्यात विधानसभा निवडणूक झाली होती. लडाखसह राज्यातील सहा लोकसभा मतदारसंघातील निवडणूक शांततेत पार पडली होती. विशेष म्हणजे आतापर्यंतच्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी मतदानाची टक्केवारीही चांगली होती. २०१४ मध्ये जम्मू-काश्मीर विधानसभेत व्याप्त काश्मिरातील २४ जागा पकडून १११ जागा होत्या. यातील व्याप्त काश्मीरच्या २४ जागा वगळून उर्वरित ८७ मतदारसंघांत निवडणूक झाली होती. यावेळी विधानसभा मतदारसंघाच्या परिसीमनानंतर राज्यात ३ जागा वाढल्या आहेत. जम्मू भागात विधानसभेच्या सहा तर काश्मीर भागात विधानसभेची एक जागा वाढली आहे. यामुळे आता काश्मीर भागात विधानसभेच्या ४७ तर जम्मू भागात विधानसभेच्या ४३ जागा झाल्या आहेत. आधी जम्मू भागात विधानसभेच्या ३७ तर काश्मीर खोऱ्यात ४६ जागा होत्या. लडाखमध्ये विधानसभेच्या फक्त चार जागा होत्या. व्याप्त काश्मीरवरील आपला दावा कायम ठेवण्यासाठी तेथील विधानसभेच्या २४ जागा जम्मू-काश्मीरच्या विधानसभेत, तेथे निवडणूक होत नसली तरी गृहीत धरल्या जातात. परिसीमनानंतर जम्मू भागातील ४४ टक्के लोकसंख्या विधानसभेच्या ४८ टक्के जागांवर तर काश्मीर खोऱ्यातील ५६ टक्के लोकसंख्या विधानसभेच्या ५२ जागांवर मतदान करणार आहे. २०१४ मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत पीडीपीला २८ तर त्याखालोखाल भाजपाला २५ जागा मिळाल्या होत्या. नॅशनल कॉन्फरन्सने १५ तर काँग्रेसने १२ जागा जिंकल्या होत्या. अपक्ष आणि अन्य छोट्या पक्षांनी ७ जागा जिंकल्या होत्या. विशेष म्हणजे भाजपाची मतांची टक्केवारी सर्वात जास्त होती. पीडीपीच्या मदतीने भाजपाने राज्यात सरकार स्थापन केले होते, पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती मुख्यमंत्री तर भाजपाचे डॉ. निर्मलसिंह उपमुख्यमंत्री झाले होते. पण हे सरकार फार काळ चालू शकले नाही, हा भाग वेगळा.

विधानसभा निवडणुकीत राज्यात ६५.५२ टक्के मतदान झाले होते. पीडीपीला २२.७० टक्के, भाजपाला २३ टक्के, नॅशनल कॉन्फरन्सला २०.८० टक्के तर काँग्रेसला १८ टक्के मते मिळाली होती. यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील लोकसभेच्या ५ पैकी भाजपाने २, नॅशनल कॉन्फरन्सने २ आणि अपक्षाने १ जागा जिंकली आहे. लोकसभा निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला यांचा बारामुल्ला मतदारसंघात तुरुंगातून निवडणूक लढवणारे अपक्ष उमेदवार रशीद इंजिनीअर यांनी पराभव केला. अनंतनाग राजौरी लोकसभा मतदारसंघात नॅशनल कॉन्फरन्सचे मिया अल्ताफ अहमद यांनी पीडीपीच्या मेहबुबा मुफ्ती यांचा पराभव केला. उधमपूर लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे डॉ. जितेंद्रसिंह तर जम्मू मतदारसंघात भाजपाचे जुगलकिशोर यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळविला. लडाख लोकसभा मतदारसंघात भाजपाचा पराभव झाला. या मतदारसंघात अपक्ष उमेदवार मोहम्मद हनिफा विजयी झाले. लोकसभा निवडणुकीत भाजपाला २४.३६ टक्के, नॅशनल कॉन्फरन्सला २२.३० टक्के, काँग्रेसला १९.३८ टक्के तर पीडीपीला ८.४८ टक्के मते मिळाली होती. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यावेळी भाजपाची २२ टक्के मते कमी झाली. २०१९ मध्ये भाजपाला ४६.३९ टक्के मते मिळाली होती. नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपीच्या मतांमध्ये अनुक्रमे १५ आणि ५ टक्क्यांनी वाढ झाली. २०१९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्सला ७.८९ टक्के तर पीडीपीला ३.४० टक्के मते मिळाली होती. भाजपाने काश्मीर खोऱ्यातील ३ लोकसभा मतदारसंघांत आपले उमेदवारच उतरवले नव्हते, तर त्याठिकाणी स्थानिक पक्षांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे यावेळी भाजपाच्या मतांची टक्केवारी कमी झाली. राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजपा, काँग्रेस, नॅशनल कॉन्फरन्स, पीडीपी तसेच गुलाम नबी आझाद यांचा जम्मू-काश्मीर पीपल्स कॉन्फरन्स हे पाच प्रमुख पक्ष आहेत. याशिवाय काही छोटे पक्षही निवडणुकीच्या रिंगणात उतरू शकतात. भाजपा गुलाम नबी आझाद यांच्या जम्मू-काश्मीर पीपल्स कॉन्फरन्ससोबत आघाडी करू शकतो. नॅशनल कॉन्फरन्स आणि पीडीपी हे दोन्ही पक्ष इंडिया आघाडीचा भाग आहेत, त्यामुळे यातील नेमका कोणता पक्ष काँग्रेससोबत आघाडी करणार, हे आताच सांगता येणार नाही. मात्र भाजपा जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागला आहे.

केंद्रीय मंत्री किशन रेड्डी यांना भाजपाने निवडणूक प्रभारी केले आहे. ३७० कलम रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे जम्मू-काश्मीर विधानसभेची निवडणूक जिंकणे भाजपासाठी आवश्यक झाले आहे. विधानसभा निवडणूक जिंकल्यामुळे भाजपाच्या या निर्णयावर राज्यातील जनतेने शिक्कामोर्तब केले, तो निर्णय मनापासून स्वीकारला, असे मानले जाणार आहे. ३७० कलम रद्द करण्याचा निर्णय देशातील जनतेने कधीच मनापासून स्वीकारला आहे, त्याचे स्वागत केले आहे. मात्र राज्यातील जनतेने तो स्वीकारल्याचे विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून स्पष्ट होणार आहे.

९८८१७१७८१७

### अनुकरणीय उपक्रम...

'एका हाती गीता आणि दुसऱ्या हाती एआय!' ही 'तरुण भारत'मधील बातमी वाचण्यात आली आणि एक सकारात्मक संदेश मिळाला. भगवद्गीता जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा एक अनमोल ग्रंथ. गीता केव्हा वाचावी? याचे उत्तर सहज 'उतारवयात' हेच येतं. पण गीता वाचून जीवनात सकारात्मक बदल करायचा तर तो बालवयात केला तर भावी आयुष्य उज्ज्वल होईल. आज आधुनिक भारताचे चित्र समोर येत असताना आध्यात्मिकतेकडे वळले तर अनेक समस्यांचे निराकरण सहज होईल. शाळा हे ज्ञान मंदिर आहे. या मंदिरात गीता पठन केले तर त्यातून होणारे संस्कार भावी पिढीला सक्षम करतीलच. आज प्रत्येकाला सर्व काही क्षणात उपलब्ध हवे आहे, पण कर्म करणे, संयम बाळगणे, क्रोधाला आवर घालणे याचेही मार्गदर्शन अत्यंत आवश्यक आहे. विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घातली तर भावी पिढी अधिक सक्षम होईल. गीता शिकणे आणि समजून घेणे आणि जीवनात त्याचा वापर करणे आवश्यक आहे. गीतेच्या प्रत्येक श्लोकात एक ऊर्जा आहे, चैतन्य आहे आणि शब्दांच्या माध्यमातून आपल्यात होणारे हे परिवर्तन निश्चित गरजेचे आहे. कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग शिकवणारी गीता जीवनाच्या प्रत्येक वळणावर साथ देणारी आहे. जीवनात प्रत्येक परिस्थितीत कसे वागावे आणि कसे वागू नये हे गीता सांगते. भारत देश अधिक सक्षम संपन्न करायचा तर शालेय जीवनात या संस्काराचे बीज मुलांच्या मनात रुजवले गेले पाहिजे तरच आदर्श आणि संपन्न व्यक्तिमत्त्व विकसित होऊन देशाचे भविष्य उज्ज्वल होईल.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

### अखंड भारतासाठी...

वेळ अशी आली आहे की, आता भारत सरकारने आपला अखंड भारत साकार करण्यासाठी जोरदार भक्कम कारवाई करण्यासाठी पावले उचलावी. यासाठी साम, दाम, दंड, नीती यांचा विचार व साहाय्याने पावले उचलावीत. हीच वेळ आहे भारताला अखंड बनविण्याची. बेलगाम राष्ट्रांना लगाम लावण्याची. आपला भारत काश्मीर ते कन्याकुमारी आणि इम्फाल नदीच्या पलीकडे पुन्हा परत शक्तीच्या रूपाने संपन्न अवस्थेत उभा राहिला पाहिजे. अखंड भारत हेच आपले स्वप्न आहे. हे स्वप्न साकारण्यासाठी सोनेरी संधी आली आहे. त्याचा फायदा भारत सरकारने घेतला पाहिजे. भारत भूमी आपली वंदनीय माता आहे. अखंड भारत पुन्हा निर्माण झाला पाहिजे.

**मधुकर डबीर**/९८२२६१५३३१

## वाचक पत्रे

### 'कुछ मीठा हो जाये...'

'इस राखी मे, कुछ अच्छा हो जाये, कुछ मीठा हो जाये...' रक्षाबंधन म्हणजे राखी पौर्णिमा जवळ आली की, समाजमाध्यमावरून जाहिरातीचे पेव फुटते. बहिणीने भावाला राखी बांधल्यावर भाऊ तिला विदेशी चॉकलेटचा मोठा बॉक्स भेट देतो, असे या जाहिरातीमध्ये दाखवतात. भारतामध्ये अनेक मिठाई प्रसिद्ध आहेत आणि त्या घरीसुद्धा बनवता येतात. घरी बनवलेल्या मिठाईमध्ये प्रेम, जिव्हाळा असतो. ती मिठाई आपल्या माणसाने खावी अशी आपुलकीची भावना असते. असे असताना रक्षाबंधनाच्या दिवशी जाहिरातीतील विदेशी चॉकलेटचा अट्टाहास का?

**दीपाली गीते**/९८२२००४०५४

### तोंड शिवले का भाऊ तुमचे?

बापा... बापा... असहिष्णूच्या नावानं कितीक माणसं बोलले होते. आठवते का? ज्याले त्याले देशात असुरक्षितच वाटे. मंग तो नसिरुद्दीन राहे का अमीर खान राहे. अजून पावेतो काहीच त झालं नाय याईले. फक्त बोंबच मारे अन् हो थे साहित्यिकाइची गेंग पन चुप हाय... अवार्ड गिवार्ड वापस कोनीच देल्ले नाय अजून. कसे देईन भाऊ? बांगलादेशात अल्पसंख्यक कोन हाय? हंऽ आत्ता समजलं तुले. थ्या हिंडेनबर्गच्या अहवालावर कसे मुकरी मुकरी बोलते काँग्रेसवाले. परदेशातले मानसं आपल्या देशाचा सर्वे करते अनं त्याईच्या वर हे कॉंग्रेसवाले विश्वास ठेवते अन् मार पत्रपरिषदा घेते. शोभते का याईले? फिलीस्थीन जिंदाबाद म्हणून संसदेत ओरडते कारन का आपल्या देशात ते मायनारीटीत हाय म्हंते, मंग बांगलादेशात कोण मायनारीटीत हाय भाऊ. बॅरिस्टर होऊन चालत नाय, पारदर्शकता पायजे तवा शिक्षणाले अर्थ. या देशातला एक बी विरोधी पक्षाले बांगलादेशातल्या अल्पसंख्यक लोकाईची चिंता नाय. कारन का त्याईच्या पॉलीसीत बसतच नाय ना ते अन् इकडे आपन अशा लोकाईले मत देऊन पन्नास जागा वाढवून देतो. थोड्या जागा वाढल्या की काय या लोकाईले वाटून रायलं आपनच जिंकलो. इतका आत्मविश्वास वाढला यायचा का इचारू नका. म्हणून पंतप्रधानांनी सीएए कायदा आणला. तो लवकर लागू झालाच पायजे. मुस्लिम देशातल्या अल्पसंख्यकांनी जायचं तरी कुठं? इकडून कोनाले तिकडं जायचं असन तं खुशाल गेलं पायजे. लोड कायले वाढवता भारतात. जनतेने चांगले डोये उघडून पायलं पायजे आता. बों बों बोंबलणारे कवा चुप रायते अन् कवा ओरडते ते...

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### सर सय्यद अहमद खान उर्दू प्राथमिक शाळा जिंतूर स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**जिंतूर,/प्रतिनिधी:** आज दि.(१५) ऑगस्ट रोजी सर सय्यद अहमद खान उर्दू प्रा शाळेत ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रथतः शाळ-चे मुख्याध्यापक शेख जावेद शेख अहमद यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ध्वजारोहण करण्यात आले. व विद्यार्थ्यांची प्रभात फेरी ही काढण्यात आली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आणि स्वातंत्र्या दिनाच्या महत्त्व निमित्त शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले तसेच देशभक्तीपर गीत, देशभक्तीपर भाषण व विविध असे वेशभूषा विद्यार्थ्यांने सादर केले शेवटी विद्यार्थ्यांना बिस्किटाचे खाऊ वाटप करण्यात आले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षक तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### एकलव्य बाल विद्या मंदिरात ध्वजारोहण

**जिंतूर,/प्रतिनिधी:** एकलव्य बाल विद्या मंदिर जिंतूर मध्ये स्वातंत्र दिन व मेरी मिट्टी मेरा देश हर घर तिरंगा निमित्त ध्वजारोहण करण्यात आले. एकलव्य बाल विद्या मंदिर जिंतूर मध्ये स्वातंत्र दिन व मेरी मिट्टी मेरा देश या कार्यक्रमांतर्गत झेंडावंदन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. गीते एस.पी.सर, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सहसचिव तथा विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी गोविंदराव लहाने सर, संस्थेचे सदस्य म्हणून पवन लहाने सर, चंद्रशेखर लहाने सर, तसेच वैजनाथ गरड महाराज व परिसरातील पालक आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी भागीरथी जीवनधारा प्रतिष्ठान लहानेवाडी स्थेचे सहसचिव तथा प्रशासकीय अधिकारी मा. श्री. गोविंद लहाने सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र दिनानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शिक्षक पालक सभा, तसेच वर्ग सजावट या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व आपले मनोगत व्यक्त केले. तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रशासकीय अधिकारी गोविंद लहाने सर यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच पालक वर्गातून वैजनाथ गरड महाराज यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी गिते सर यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. चौधरी एस. जे. व आभार प्रदर्शन कह्राळे गजानन यांनी केले. या कार्यक्रम ासाठी शाळेतील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### जनार्दन काळे यांचे निधन



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ शहरातील प्रतिष्ठित नागरिक डॉ.जनार्दन मारोती काळे यांचे बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले मृत्यू समयी ते ९५ वर्षांचे होते.१९७० च्या दशकात पशुवैद्यकीय अधिकारी म्हणून सोनपेठ शहरात त्यांनी मुक्या प्राण्यांची सेवा केली होती. सोनपेठ न.प.चे माजी उपनगराध्यक्ष सुहास काळे, हॉटेल गुलमोहर चे संचालक सचिन काळे व जेष्ठ पत्रकार वैभव काळे यांचे ते वडील होते.त्यांच्यावर दि.१५ ऑगस्ट रोजी सकाळी सोनपेठ सोनपेठ येथील स्मशानभूमीत अंत्यासंस्कार करण्यात आले.त्यांचे पश्चात तिन मुलं,मुली,सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### दुर्राणी समर्थकांव्दारे पाथरीत कडकडीत बंद



**पाथरी,/प्रतिनिधी-** आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याच्या निषेधार्थ दुर्राणी समर्थकांनी बुधवारी (दि.१४) पाथरीत कडकडीत बंद पाळला. तसेच रॅली काढून तालुका प्रशासनास निवेदन सादर करीत सदर दाखल केलेला गुन्हा हा खोटा असून तो मागे घेण्यात यावा, अशी मागणी केली.

मंगळवारी (दि.१३) रात्री शहरातील ज्येष्ठ नागरिक बाळकृष्ण कांबळे यांचा मृतदेह त्यांच्या शेतातील आखाड्यावर आढळून आला. या प्रकरणी पाथरी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली. पंचनामा करतेवेळी पाथरी पोलसांना मृतदेहाजवळ सुसाईड नोट आढळून आली, त्याआधारे माजी आमदार बाबाजानी दुर्राणी व विजय प्रभाकर वाकोडे यांच्याविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पाथरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पाथरी शहरात कमालीचा तणाव निर्माण झाला. दुर्राणी समर्थकांनी या गुन्ह्याचा निषेध नोंदविण्याकरीता बुधवारी पाथरी बंदची हाक दिली. त्यानुसार बुधवारी सकाळपासूनच शहरातील सर्वच बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली. दुपारी १२ वाजता माजी आमदार दुर्राणी यांच्या घरापासून उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत समर्थकांनी शांततेत रॅली काढली. दुर्राणी यांच्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला असून तो गुन्हा तात्काळ मागे घेण्यात यावा, या मागणी निवेदन देण्यात आले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सेनानींना वंदन करण्याचा दिवस- जिल्हाधिकारी

**परभणी,/प्रतिनिधी:** पारतंत्र्यात असणाऱ्या आपल्या मातृभूमीस स्वतंत्र होण्याच्या घटनेस आज ७७ वर्षे पूर्ण होत आहेत. स्वातंत्र्या प्राप्तीसाठी असंख्य महामानवांनी आपले सर्वस्व पणास लावले. ब्रिटीशांच्या जुलमी राजवटीचे अन्याय, अत्याचार सहन केले. अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला. महान स्वातंत्र्या सेनानीसह अनेकांनी स्वातंत्र्या लढ्यात आपले सर्वस्व पणाला लावले. त्या सर्वांना वंदन करण्याचा, त्यांच्या समोर नतमस्तक होण्याचा हा दिवस असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले.



भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्या दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजवंदनाचा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात श्री. गावडे यांच्या हस्ते पार पडला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार डॉ. राहुल पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त त्तृाी सांडभोर, अपर जिल्हाधिकारी डॉ. प्रताप काळे, अपर पोलीस अधीक्षक यशवंत काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्धन विधाते, उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे यांच्यासह जिल्हा प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

पुढे श्री. गावडे म्हणाले की, हजारो वर्षाची वैभवशाली परंपरा असणाऱ्या आपल्या देशाने स्वातंत्र्योत्तर काळात नेत्रदिपक प्रगती साधली, याचा आम्हा भारतीयांना सार्थ अभिमान आहे. भारतातील लोकशाही मूल्यांचे जतन झाल्याने आपल्या देशाने जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था निर्माण करुन जगासमोर एक आदर्श ठेवला आहे. आपल्या देशाने मिश्र पद्धतीची अर्थव्यवस्था स्वीकारल्याने विकास प्रक्रिया सर्वसामान्यांपर्यंत पोहचत असल्याचे आपण पाहत असल्याचे सांगितले.

आपल्या जिल्ह्यासमोर विविध समस्या आहेत, परंतू या समस्या प्राधान्याने सोडवण्याचा प्रयत करण्यात येईल. याकरीता शासन आणि प्रशासनामार्फत देखील सर्वतोपरी प्रयत केले जातील. आपण सर्वांनी मिळून सांघिक भावनेने या समस्यांचे निराकरण करू, नवभारताचे स्वप्न साकारण्यासाठी भारतम ातेची एकजुटीने सेवा करु असे सांगत जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी नागरिकांना भारतीय स्वातंत्र्या दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्य ध्वजवंदन कार्यक्रमास लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्या सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, ज्येष्ठ नागरिक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, आणि पत्रकार उपस्थित होते.

मुख्य कार्यक्रमानंतर श्री. गावडे यांनी उपस्थितांना अभिवादन करत स्वातंत्र्या दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. तसेच स्वातंत्र्या सैनिक, वीरपत्नी, वीरमाता यांचा सत्कार केला. यावेळी जिल्ह्यातील शिष्यवृत्ती परीक्षातील राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देवून जिल्हाधिकारी श्री. गावडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी जिल्हाधिकारी श्री. गावडे यांच्या हस्ते वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयाच्या चित्ररथाचे आणि सामाजिक न्याय विभाग आणि दिव्यांग संघटना द्वारा नशामुक्त भारत अभियानास हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले.



## अजय किरकन यांना विशेष सेवा पदक प्रदान



**सोनपेठ/ प्रतिनिधी-** येथील पोलिस ठाण्यात कार्यरत फौजदार अजय आनंदराव किरकन यांनी गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधी कारवायांमध्ये केलेल्या विशेष कामगिरीसाठी त्यांना महासंचालकांचा विशेष सेवा पदक हा सन्मान जाहीर झाला आहे. फौजदार अजय आनंदराव किरकन यांची पोलिस दलात सहा वर्षे सेवा झाली आहे. ते २०१८ मध्ये पोलिस दलात सामील झाले, प्रशिक्षणानंतर त्यांनी २०२० मध्ये गडचिरोली जिल्ह्यात पोलिस दलात सेवेला सुरुवात केली होती. २०२०-२३ या चार वर्षांच्या काळामध्ये त्यांनी गडचिरोली जिल्ह्यात पोलिस उपनिरीक्षक पदावर काम केले. गोंदिया व गडचिरोली हे नक्षलग्रस्त जिल्हे म्हणून जाहीर केले आहेत. किरकन यांनी गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना आळा घालण्यासाठी कार्य केले होते. या कार्याची दखल घेऊन त्यांना विशेष सेवा पदक जाहीर केले आहे. ते सप्टेंबर २०२३ पासून सोनपेठ पोलिस ठाण्यात फौजदार म्हणून रुजू झालेले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल परभणीचे पोलिस अधीक्षक रवींद्र परदेशी, अप्पर पोलिस अधीक्षक यशवंत काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी दिलीप टीपरसे, पोलिस निरीक्षक सूर्यमोहन बोलमवाड आदींसह सहकाऱ्यांनी सत्कार केला. यापूर्वी अजय किरकन यांना याच कामगिरीसाठी अंतरिम सुरक्षा पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. त्यामुळे आता हे पदक जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा गौरव झाला. या पदकाबद्दल किरकन यांनी समाधान व्यक्त केले.

### चित्रकला स्पर्धेत देशमुख व खराबे प्रथम

**परभणी,/प्रतिनिधी-** मनपा व शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यम ाने 'हर घर तिरंगा' अभियान अंतर्गत आयोजित केलेल्या चित्रकला स्पर्धेत विविध गटात मृणाल देशमुख व कृष्णा खराबे या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. येथील कल्याण मंडपम येथे बुधवार १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ही चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त मीनिनाथ दंडवते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपशिक्षणाधिकारी गणराज अरमळ, शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद मोरे, मालमत्ता व्यवस्थापक भगवान यादव, प्रभाग समिती अ सहाय्यक आयुक्त अल्केश देशमुख, सांस्कृतिक व क्रीडा विभाग प्रम ुख राजकुमार जाधव, भांडारपाल रामेश्वर कुलकर्णी, परीक्षक केशव लग्गड उपस्थित होते. यावेळी या स्पर्धेची पाहणी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, शिक्षणाधिकारी आशा गरुड यांनी केली.

## मंडळ अधिकारी शिवाजी कराड यांचा स्वातंत्र्य दिनी गौरव संपन्न

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ तहसील कार्यालयातील मंडळ अधिकारी शिवाजी कराड यांनी महसुली कार्यात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्या दिनाच्या निमित्ताने परभणी चे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी गौरव पत्र देऊन सन्मानित केले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने महसूल विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा महसूल दिनी सन्मान करण्यात येतो. त्यानिमित्ताने सोनपेठ येथील तहसील कार्यालय मंडळ अधिकारी पदावर कार्यरत असलेले शिवाजी कराड यांनी सन २०२३-२०२४ मध्ये केलेल्या शासकीय वसुली, उद्दिष्टपूर्ती व नियोजन या उल्लेखनीय आणि प्रशंशनीय कार्याबद्दल त्यांना जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रताप काळे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरे, पाथरी चे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, गंगाखेड चे उपविभागीय अधिकारी जिवराज डापकर, उपविभागीय अधिकारी परभणी, उपविभागीय अधिकारी सेलू यांची उपस्थिती होती. त्यांच्या या यशाबद्दल सोनपेठ चे तहसीलदार सुनील कावरखे, नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी व सर्व तहसील कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



## नियमीत वाचनाने ज्ञान वाढते- डॉ.समाधान पाटील

**पूर्णा,/प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांनी वाचनालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकाचे वाचन करावे व वाचन संस्कृती वाढणे गरजेचे आहे. तसेच नियमित वाचनाने ज्ञान वाढत असल्याचे प्रतिपादन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.समाधान पाटील यांनी व्यक्त केले.

साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्या दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन व म ान्यवरांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी नायब तहसीलदार प्रशांत थारकर पोलीस निरीक्षक विलास गोबाडे उपस्थित होते. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ पाटील यांच्या हस्ते झाले त्यांनी वाचनालयात दर्जे दार पुस्तकांची संख्या व दुर्मिळ ग्रंथ पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. आजच्या प्रचंड स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळणे अत्यांत आवश्यक आहे वाचनासोबतच नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे ही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



यावेळी उपस्थित मान्यवरांचा ग्रंथ भेट देऊन ग्रंथालयाचे अध्यक्ष ओंकारसिंह ठाकुर उपाध्यक्ष व्यंकटराव मुळे ,सचिव एम जे पांचाळ, सदस्य टी एन पांचाळ, सदस्य चंद्रकांत टाकळकर आदींनी ग्रंथ भेट देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाला ॲड. संजय गव्हाणे,ॲड. बाळासाहेब उगले, पूर्णा तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मुजीब कुरेशी, विजय बगाटे , देवगिरी एक्सप्रेसचे संपादक अतुल शहाणे, पत्रकार दौलतराव भोसले, पत्रकार संपत्त तेली यांच्यासह पत्रकार, नागरिक उपस्थित होते प्रास्ताविक व्यंकटराव मुळे यांनी केले सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल सतीश टाकळकर यांनी मानले.

### नव मतदारांनी नाव नोंदणी करावी- शेळके

**परभणी,/प्रतिनिधी-** म हाविद्यालयातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मतदारांनी व भविष्यातील नवं मतदारांनीही मतदार यादीत नाव नोंदणी करावी, असे आवाहन प्राचार्य पी.बी. शेळके यांनी केले.

परभणी तालुक्यातील पोखर्णी येथील नृसिंह उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजित नवं मतदार विशेष नोंदणी कार्यक्रमात ते बोलत होते.

## बालवाचकांना पुस्तके वाटप करुन जैन वाचनालयाने केला पुरस्काराचा आनंदोत्सव

**परभणी ,/प्रतिनिधी:** येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाने बालवाचकांना पुस्तके वाटप करून पुरस्काराचा आनंदोत्सव साजरा केला. महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार बोरीच्या कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयास जाहीर झाला, या पुरस्काराचा आनंद सोहळा १५ ऑगस्ट रोजी बालवाचकांच्या सानिध्यात साजरा करण्यात आला.



यानिमित्या संपूर्ण वा-चनालय सजविण्यात आले होते. रंगीबेरंगी पताका, बलून लावून विद्युत रोषणाई करण्यात आली होती. फटाक्यांची आतिषबाजी करून हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वाचनालयाच्या अध्यक्षा सौ मिना जैन या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मा. उपाध्यक्ष अजय चौधरी, बोरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अनिल खिल्लारे, ग्रामपंचायतचे माजी सदस्य अमृतराव चौधरी, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख एस. आर .कौटकर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष संतोष चौधरी ,पंचायत समितीचे माजी गटनेते सुभाषतात्या घोलप हे उपस्थित होते. सर्वप्रथम महात्मा गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर मान्यवरांचे स्वागत पवन ओझा, बालप्रसाद सोमानी, सूर्यप्रकाश सोनी, दीपक राजुरकर, ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी केले. वाचनालयाचे ज्येष्ठ संचालक पत्रकार दीपक राजुरकर यांचा म ान्यवरांच्या हस्ते शाल श्रीफळ, देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला . त्यानंतर ५० बालकांना पुस्तके, तिरंगा ध्वज व पेढ्यांचे वाटप करण्यात आले . महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ग्रंथपाल नेमिनाथ जैन व अध्यक्ष सौ. मीना जैन यांचा शाल ,श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला . स्वातंत्र्या दिनानिमित्त पियुष पवन ओझा यांनी इंग्रजी भाषेतून आपले विचार मांडले . यावेळी बालवाचकांना मार्गदर्शन करताना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अजय चौधरी म्हणाले की ,जैन वाचनालयास महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार जाहीर झाला. ही बोरिवासीयांसाठी गौरवास्पद बाब असून यामुळे बोरीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवल्या गेला आहे. जैन वाचनालयास यापूढेही ग्राम पंचायत व आमच्यातर्फे वेळ-ोवेळी पाहिजे ती मदत देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले .या वाचनालयात समृद्ध अशी ग्रंथसंपदा असून त्या-ाचा लाभ बोरी व परिसरातील वाचकांनी घ्यावा असे आव-ाहनही त्यांनी यावेळी केले. बोरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अनिल खिल्लारे म्हणाले की, वाचनाने बुद्धीचा विकास होतो. वाचनालय ही आपल्या ज्ञानाची भूक भागव-तात त्यामुळे पुस्तकांच्या सानिध्यात राहून आपल्या बुद्धीचा विकास करून घ्यावा. येथे आल्यावर वाचण्याची सवय लागते व ही वाचण्याची सवय भविष्यात उच्च शिक्षण घेताना कामी येते असे त्यांनी स्पष्ट केले . अध्यक्षीय समारोप वाचनालयाचे उपाध्यक्ष पवन ओझा यांनी केला.

२५ वर्षाच्या तपश्चर्याचे आज या पुरस्काराच्या रूपाने आम्हाला फळ मिळाले आहे .यापुढेही असेच वाचन चळवळ वृद्धिंगत करण्याचा आमचा म ानस राहील. विद्यार्थ्यांत वाचना-ची आवड निर्माण करण्यासाठी आम्ही सतत प्रयतशील राहू असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांनी केले .कांता सोमानी, सौ सुनीता सोनी, सौ प्रतिभा ओझा ,सौ दैवशाला मजगे ह्या कार्यक्रमास उपस्थित होत्या. सात्विक बुलबुले याने कार्यक्रम ासाठी पुढाकार घेतला होता.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# केज रोटरीचा गरजू मुलींना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१६ ऑगस्ट**

येथील रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने केज तालुक्यातील विविध शाळांच्या गरजू व हुशार मुलींना स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने पाच सायकलचे वाटप केजचे तहसीलदार सचिन देशपांडे, केज पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक महाजन, केज रोटरी अध्यक्ष प्रकाश कामाजी व इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

येथील रोटरी क्लब ऑफ केज गेली एकोणीस वर्षांपासून केजच्या सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवत आहे. यावर्षी क्लबच्या वतीने विविध शाळांच्या कांही गरजू व हुशार मुलींना सायकलचे वाटप करण्यात आले. या मुलींची निवड शाळेच्या शिफारशी वरून करण्यात आली. या मुलींना सायकलची गरज असल्याने क्लब चे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, रोटरी डिस्ट्रिक्ट सहायक प्रांतपाल विवेक गंगणे आणि प्रोजेक्ट चेअरमन प्रवीण देशपांडे यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात आला. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून केज तहसील कार्यालयाचे मुख्य ध्वजारोहण पार पडल्यानंतर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात तहसीलदार सचिन देशपांडे, प्रभारी पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, रोटरी सहाय्यक प्रांतपाल विवेक गंगणे, केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी व इतर मान्यवरांच्या हस्ते सायकलचे वाटप करण्यात आले. चालू वर्षात केज रोटरी च्या वतीने विविध समाजउपयोगी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे अध्यक्ष प्रकाश कामाजी यांनी बोलताना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोटरी क्लब ऑफ केज चे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रोजेक्ट चेअरमन प्रवीण देशपांडे, विकास मिरगणे, सूर्यकांत चवरे, धनराज पुरी, दादा जमाले, अरुण अंजाण, बापूराव सिंगण, पशुपतीनाथ दांगट, संतोष पिलाजी, बापूराव वाळके इत्यादी रोटरी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी केजचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत तिरंगा रॅली



राष्ट्रीय सेवा योजनेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ ऑगस्ट**

दिनांक १५ ऑगस्ट २०२४ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत हर घर तिरंगा अभियान दिनांक ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२४ या दरम्यान चालू होते या अभियानांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तिरंगा रॅलीचे आयोजन ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी करण्यात आले होते. या रॅलीला स्वातंत्र्यवीर सावरकर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष डॉ. पी. के. कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ प्रीती पोहेकर , उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ. राजेश ढेरे उपस्थित होते या रॅलीमध्ये बहुसंख्य स्वयंसेवक व स्वयंसेविका यांचा उत्स्फूर्तपणे सहभाग होता. रॅलीचा मार्ग महाविद्यालय परिसरापासून कृष्ण मंदिरापर्यंत होता. भारत माता की जय, वंदे मातरम च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, नेतृत्व गुण व देशावरील प्रेम जागृत व्हावे यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व सहकारी प्राध्यापक कर्मचारी व सर्व स्वयंसेवक सेविका यांनी रॅलीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपले देशावरील प्रेम व्यक्त केले रॅली यशस्वी साठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे, डॉ. सुहास जोशी, डॉ संगीता ससाने, डॉ. सुनिता कुरुडे, स्वयंसेवक गणेश जोशी, पवन कपाळे, निखिल वाघमारे, अजय शिंदे, भागवत आगलावे, कुमारी गायत्री दगडे, सिया राजपूत, वृषाली कुलकर्णी, आधी विद्यार्थी उपस्थित होते.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियान उत्साहात

## विद्यार्थ्यांची शहरातून भव्य तिरंगा पदयात्रा तसेच संविधान ग्रंथ वाटप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१६ ऑगस्ट**

स्वातंत्र्य दिनानिमित्त आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत सुंदरराव सोळंके महाविद्यालयात हर घर तिरंगा अभियान उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्यावतीने माजलगाव शहरातून भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. तर संविधानाच्या ग्रंथाचे वाटप करण्यात आले.

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दि १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधी दरम्यान हर घर तिरंगा अभियान राबविण्यात आला. दि १४ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातून भव्य तिरंगा पदयात्रा काढण्यात आली . या तिरंगा पदयात्रेमध्ये विद्यार्थ्यांनी भारताचा जयघोष करत घोषणा दिल्या व तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी,प्राध्यापक कर्मचारी यांना महाविद्यालयात संविधानाच्या प्रति चे वाटप करण्यात आले. यावेळी पदयात्रेमध्ये प्राचार्य डॉ. जी.के. सानप, उपप्राचार्य डॉ.एन के मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते , उपप्राचार्य पवन शिंदे, रा. से .यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, प्रा. बीलास काळे,प्रा. ओमप्रसाद सारगे, यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी प्राध्यापक कर्मचाऱ्यांनी उस्फुर्त सहभाग घेतला. दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे कुस्ती व बुद्धिबळ स्पर्धेत यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१६ ऑगस्ट**

तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये ग्रीक रोमन व फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात १९ वर्ष वयोगटात सुमितकुमार लक्ष्मण भारस्कर प्रथम, ग्रीक रोमन कुस्ती प्रकारात राज विनोद वाघमारे प्रथम, व बुद्धिबळ क्रीडा स्पर्धेत रामेश्वर चंद्रसेन शिंदे हा खेळाडू प्रथम आला , पुढे या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, हे खेळाडू सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहेत , या खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रा.प्रविण कोरडे. प्रा नवनाथ आवारे प्रा.सुखदेव माने. प्रा डॉ. सी. डी. फड यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी खेळाडूंचे म. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके, यांच्यासह ॲड.बी.आर. डक, सत्यप्रकाश रुद्रवार, निळकंठ साबळे, डॉ. सुनील गरड, वगरे नाना, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन.के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए कव्हळे,प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे,यांनी अभिनंदन केले.

# कोलकत्ता येथील बलात्कार प्रकरणाचा डॉक्टरांकडून तीव्र शब्दांत निषेध

## परळी मेडिकल असोसिएशन आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचे शासनाला निवेदन
## शनिवारी परळीतील सर्व वैद्यकीय सेवा राहणार बंद

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१६ ऑगस्ट**

कोलकाता येथील आर. जी. कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात एका ट्रेनी डॉक्टरवर बलात्कार करुन तिची हत्या केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणातला खुनी संजय रॉयला पोलिसांनी अटक केली आहे. तरीही हे प्रकरण गुंतागुंतीचं झालं आहे. त्यामुळे कोलकाता उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर हे प्रकरण पोलिसांनी सीबीआयकडे सोपवलं आहे. सदरील घटनेचा निषेध म्हणून परळी मेडिकल असोसिएशन आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने परळी तहसील कार्यालयात निदर्शने करण्यात आली. यावेळी आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी प्रचंड घोषणाबाजीही केली गेली. तहसीलदार यांच्यामार्फत शासनाला मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी परळी शहरातील सर्व डॉक्टर मंडळींची उपस्थिती होती.

परळी मेडिकल असोसिएशन आणि इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वतीने शासनाला दिलेल्या निवेदनातून डॉक्टरांवर दिवसेंदिवस वाढत असलेल्या अमानुष हल्ले आणि महिला डॉक्टरांवरील अत्याचारांच्या घटनांचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. कोलकत्ता येथे घडलेली घटना ही अतिशय निंदनीय आणि विकृत मानसिकतेतून घडली आहे. त्यातील आरोपी हे उच्चभ्रू कुटुंबातील असून पश्चिम बंगाल सरकारमधील मंत्र्यांशी त्यांचे जवळचे नातेसंबंध आहेत. मात्र त्यांना पाठीशी न घालता तत्काळ अटक करून कठोर शिक्षा केली गेली पाहिजे. याचबरोबर अशा घटनांना पायबंद व्हावा यासाठी कठोर कायदे गेले पाहिजेत, जेणेकरून भविष्यात अशा घटनांना पायबंद बसेल अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर परळी मेडिकल असोसिएशनच्या अध्यक्षा डॉ.शालिनीताई कराड, सचिव डॉ.मनोज मुंडे तसेच इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.अजित केंद्रे, सचिव डॉ.विजय रांदड यांच्यासह दोन्हीही संघटनांच्या सदस्यांच्या स्वाक्षरी आहेत. यावेळी डॉ.हरिश्चंद्र वंगे, डॉ.मधुसूदन काळे, डॉ.बालासाहेब कराड, डॉ.सूर्यकांत मुंडे, डॉ.अजित केंद्रे, डॉ.राजेश जाजू, डॉ.गुरुप्रसाद देशपांडे, डॉ.अनिल घुगे, डॉ.सुनील मुंडे डॉ.अर्शद शेख, डॉ.सचिन बलुतकर, डॉ.विजय रांदड, डॉ.संजय गीते, डॉ.ध्रुवनारायण तोतला, डॉ. शाम काळे, डॉ.पाठक, डॉ.आशिष मुंदडा, डॉ.उमेश मुंडे डॉ.पांडुरंग फड, डॉ.शशिकांत कराड, डॉ.शिरीष आघाव, डॉ.कांकरिया, डॉ.विश्वास भायेकर, डॉ.रंजना घुगे, डॉ.अनुराधा काळे, डॉ.रुक्मिणी मुंडे, डॉ. नेहा शेख, डॉ.अर्चना मिसाळ, डॉ.दैवशाला घुगे, डॉ.सुनीता झंवर, डॉ.हर्षा भायेकर, डॉ.शितल गरकळ यांच्यासह अनेकांनी या आंदोलनात सहभाग नोंदवला.



संपूर्ण वैद्यकीय सेवा शनिवारी कडकडीत बंद!

कोलकत्ता येथे विकृत मानसिकतेतून घडलेल्या निंदनीय घटनेचा निषेध म्हणून शनिवारी परळी शहरातील सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा बंद ठेवण्यात येणार आहेत. परळी मेडिकल असोसिएशन आणि इंडियन मेडिकल असोसिएशन यांनी अशा प्रकारचा निर्णय घेतला असून वैद्यकीय सेवा बंद ठेऊन निषेध नोंदविण्यात येणार आहे.

# उमापूरचे ग्रामीण रुग्णालय गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल-आ.लक्ष्मण पवार

## नवीन इमारत बांधकामासाठी तब्बल ०८ कोटी रुपये मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१६ ऑगस्ट**

उमापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारत व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने बांधकामासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तब्बल ०७ कोटी ८८ लक्ष ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी मंजूर झाल्यानंतर केंद्र सरकार व राज्य सरकारचे आमदार लक्ष्मण पवार यांनी आभार व्यक्त केले. हे ग्रामीण रुग्णालय उमापुर पंचक्रोशीतील गोरगरीब गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल अशी भावना आमदार लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून व्यक्त केली.

दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात पुढे आमदार पवार म्हणाले की,उमापूर येथे नव्याने ग्रामीण रुग्णालय मंजूर करण्यासाठी राज्याचे तत्कालीन आरोग्य मंत्री दीपकजी सावंत व तत्कालीन आरोग्य संचालक डॉक्टर बी. डी. पवार यांच्याकडे सतत पाठपुरावा केला. आपण केलेल्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले व उमापूर पंचक्रोशीतील गोरगरीब गरजू रुग्णांना उत्तम आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र शासनाने उमापूर येथे ४ जून २०१९ ला शासन आदेश पारित करून विशेष बाब म्हणून नवीन ग्रामीण रुग्णालय मंजूर केले.

ग्रामीण रुग्णालयाला मंजुरी मिळाल्यानंतर रुग्णालयासाठी अद्यावत अशा प्रकारची इमारत असणे व रुग्णालयामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था असणे आवश्यक होते. तत्कालीन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉक्टर भारतीताई पवार यांना निवेदन देऊन उमापूर येथील ग्रामीण रुग्णालय, जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व धोंडराई येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारत बांधकामासाठी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी निधीची मागणी केली. भारतीताई पवार यांचे ए पी एस तथा आयुष्यमान भारत योजना महाराष्ट्र राज्याचे प्रमुख ओमप्रकाशजी शेटे यांच्या माध्यमातून वेळोवेळी पाठपुरावा केला. आज त्या पाठपुराव्याला यश आले असून पहिल्या टप्प्यात उमापूर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामासाठी तब्बल ०७ कोटी ८८ लक्ष ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर झाला व १२ / ०८ / २०२४ रोजी सदर कामास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.धोंडराई येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व जातेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नूतनीकरणासाठी पाठपुरावा सुरू असून उमापूर ग्रामीण रुग्णालयासाठी देखील अधिकचा ( उर्वरित ) निधी उपलब्ध व्हावा यासाठी पाठपुरावा सुरू आहे. येणाऱ्या काळात त्याही प्रयत्नांना यश मिळेल अशी अपेक्षा देखील आमदार पवार यांनी व्यक्त केली.दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात शेवटी आमदार पवार म्हणाले की चकलांबा जिल्हा परिषद गट व उमापूर जिल्हा परिषद गट तसेच मादळमोही व धोंडराई जिल्हा परिषद गटातील काही गावांच्या गरीब गरजू रुग्णांना उपजिल्हा रुग्णालय गेवराई हे दूर पडत होते तसेच गैरसोयीचे देखील वाटत होते. उपजिल्हा रुग्णालय गेवराई येथे मिळणाऱ्या सर्व आरोग्याच्या सुविधा येणाऱ्या काळात ग्रामीण रुग्णालय उमापूर येथे उपलब्ध होतील. रुग्णालयातील डॉक्टरांची व कर्मचाऱ्यांची संख्या वाढेल यामुळे रुग्णांची हेळसांड होणार नाही. हे ग्रामीण रुग्णालय उमापूर पंचक्रोशीतील गरीब गरजू रुग्णांसाठी वरदान ठरेल अशी भावना देखील आमदार लक्ष्मण पवार यांनी व्यक्त केली.



# जय किसान गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी शुभम निक्ते,उपाध्यक्षपदी सुरज तिबोले आणि सचिव पदी साई शिनगारे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१६ ऑगस्ट**

किल्ले धारूर शहरातील कसबा विभागात जय किसान गणेश मंडळ ( कसब्याचा राजा )म्हणून ओळखले जाणारे सर्वात जुने गणेश मंडळ आहे. या मंडळाने गेल्या साठ वर्षांपासून गणेशोत्सव काळात विविध सामाजिक उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी १४ ऑगस्ट रोजी कार्यकरणी निवडीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत ज्येष्ठ सदस्य मारुती जाधव, शिवाजी पवार, गणेश सावंत, अण्णा तिबोले, डॉ. मयूर सावंत, राहुल कठाळे, कुलदीप दरेकर यांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीत सर्वसंमतीने शुभम निकते यांची अध्यक्ष, सुरज तिबोले यांची उपाध्यक्ष आणि साई शिनगारे यांची सचिव पदी कोषाध्यक्ष अमोल जगताप,प्रताप तिबोले(सहकोषाध्यक्ष)पवन निक्ते (सह सचिव)प्रदीप जाधव,ओम सावंत,जयम जगताप (सांस्कृतिक अध्यक्ष) कृष्णा गव्हाणे (सह सांस्कृतिक) महेश भैरे,गणेश गिरी (वाद्य पथक अध्यक्ष)बंटी जाधव,व्यंकटेश फुंन्ने,यश उमाप,साई साखरे अभि जगताप (सोशल मीडिया) सागर ढाणे,ज्योतिबा तिबोले,ऋषिकेश गव्हाणे (नियोजन प्रमुख) यांच्या निवडी करण्यात आल्या जय किसान गणेश मंडळाचे सदस्य संतोष खामकर,अनुभव शेंडगे,मचिंद्र सिरसट,निलेश शिनगारे,अभि जगताप,राहुल सोळंके,अमोल पवार,सुरज गव्हाणे,नाना सावंत,दीपक दरेकर,सतीश बांगर,कृष्णा इंगळे,दिनेश सिरसट,बाळू कदम,वैजनाथ खामकर,सुरज गव्हाणे,शुभम पोपळे, रोहित सुपारे,दीपक सुपारे उपस्थित होते.उपस्थित होते यावेळी पदाधिकारी यांचे सर्वांनी स्वागत केले.

# जिवाची वाडी ग्रामपंचाय कार्यालयात ध्वजावंदन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**येवता दि.१६ ऑगस्ट**

केज तालुक्यातील जिवाची वाडी ग्रामपंचायत कार्यालयाचा स्वातंत्र्यदिनी ध्वजावंदनाचा कार्यक्रम गावच्या प्रथम नागरीक तथा महिला सरपंच श्रीमती प्रेरणा दिपक काळे यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला ध्वजारोहना कार्यकमास मुख्याधापक अंकश मोराळे,दिपक काळे,शिवाजी फुंदे,रामधन चौरे,डोईफोडे,ग्रामपंचाय कर्मचारी नवनाथ सोळूंके इत्यादी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी सरसकट अनुदान देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१६ ऑगस्ट**

धारूर शहर तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२३ मधील सोयाबीन व कापूस पिकाचे अनुदान सरसगट देण्याबाबतचे निवेदन शेतकऱ्यांच्या सह्या करून तहसील कार्यालयात तहसीलदारांना देण्यात आले.

सन २०२३ मध्ये सोयाबीन व कापूस पिकाचे अनुदान शासन वितरित करत आहे.यासाठी ई-पिक पाहणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. परंतु, धारूर शहरातील व तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी केली आहे, त्यांचे नाव अनुदान यादीत आलेले नाहीत.त्यामुळे शेतकऱ्यांनी सरसगट अनुदान देण्याची मागणी केली आहे. यामध्ये कोणत्याही शेतकऱ्यास अनुदानापासून वंचित ठेवण्यात येऊ नये, अशी मागणी केली आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे ई-पिक पाहणी केली असतानाही, त्यांचे नाव अनुदान यादीत आलेले नाही.यासंदर्भात शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे, की सन २०२३ मधील सोयाबीन व कापूस पिकाचे अनुदान, धारूर शहरातील व तालुक्यातील शेतकऱ्यांना सरसगट देण्यात यावे. सुनील शिनगारे, विनायक शिनगारे , संजय तिबोले, अजित शिनगारे ,



बाळासाहेब नखाते , लहू फुटाणे ,बालासाहेब माईकर , आश्रुबा मुंडे , मुरलीधर सुरवसे ,सुरेश शिंपले,रामेश्वर खामकर, जोखाराम गायसमुद्रे प्रताप शिनगारे, कुलदीप दरेकर,भागवत शिनगारे, बालासाहेब जाधव, मुकुंद फावडे, राम शिनगारे, परमेश्वर शिनगारे, विष्णु शिनगारे, रंगनाथ सोळंके, इतरांनी निवेदनावर सह्या करून निवेदन दिले

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांचेहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७७ वा वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वज-ारोहण समारंभ पार पडला. त्यावेळी जिल्हाधिकारी श्री. परदेशी यांनी उपस्थितांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार तान्हाजी मुटकुळे, माजी आमदार रामराव वडकुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, नूतन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटूकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर जाधव, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांच्यासह अधिकारी-कर्मचारी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी देशसेवेसाठी प्राणांची आहुती दिलेल्या सर्व हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करुन स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी व सर्व उपस्थित मान्यवरांची भेट घेऊन स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून हर घर तिरंगा अभियानाची आणि तंबाखू विरोधी जनजागृती व तंबाखू विरोधी शपथ जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी उपस्थित पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, विद्यार्थी-विद्यार्थिनींना दिली.

जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्यामध्ये स्वराज संदीप तिवडे या विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात ग्रामीण भागातून १४ वा आल्याबद्दल तर बालाजी नरहरी काळे या सहशिक्षकाने 'हिट अँड रन' अपघात आई व बाळाचे प्राण वाचविल्याबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाकडून बालरोग विभाग हिंगोलीला राज्यातील पहिला 'मुस्कान' पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दीपक मोरे, आणि डॉ. गोपाल कदम यांच्यासह चमूचा सन्मान करण्यात आला. वैद्यकीय अधिकारी डॉ. बालाजी भाकरे यांच्या समुहाने ई-संजिवनी अंतर्गत १ लाख २६ हजार रुग्णांना मोफत आरोग्य सुविधा दिल्याबद्दल जिल्हाधिकारी श्री. परदेशी यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

त्याशिवाय मृदा आरोग्य पत्रिका वाटप केल्याबद्दल कृषी विभागाचे गजानन लोडे आणि त्यांचा चमू, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये औंढा तालुक्यातील चौंडी शहापूर, वसमत तालुक्यातील चिखली आणि विरेगाव या गावाचा धनादेश व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेतर्फे राष्ट्रीय जल विज्ञान प्रकल्प अंतर्गत भूजल जनजागृतीसाठी चित्ररथ-ाला जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी हिरवी झेंडी दाखवली. देशसेवेसाठी हौतात्म्य पत्करलेल्या शहिदांच्या वीर पिता, वीर माता, वीर पत्नी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे जोडीदार यांनाही गौरविण्यात आले. यावेळी विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# आदर्श कॉलेज परिसरात होणार दोन नवीन जलकुंभाचे बांधकाम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

मागील काही वर्षापासून आदर्श कॉलेज परिसरात सर्वात जुन्या दोन टाक्या आहेत परंतु या भागामध्ये वाढलेली लोकसंख्या व नवीन नगरे या टाकीला जोडल्यामुळे आठ ते दहा दिवसात केवळ ४० मिनिटे पाणीपुरवठा होत आहे. पाण्याच्या टाक्यांची स्वच्छतेचा प्रश्नही ऐरणीवर आहे. त्या अनुषंगाने १५ ऑगस्ट रोजी आदर्श कॉलनी, हिल टॉप कॉलनी, संमती कॉलनी, विवेकानंद नगर, गोविंद नगर, जिजामाता नगर, लाला लजपतराय नगर या भागा-तील नागरिकांनी हिंगोली विधानसभेचे आ. तान्ह-ाजीराव मुटकुळे यांची शासकीय विश्रामगृह येथे भेट घेऊन पाणी पुरवठा, लाईट व अकोला बायपास व आदर्ष कॉलेजला जोडणारा रस्ता तसेच इतर अंतर्गत रस्ता या मुख्य प्रश्नाबद्दल माहिती दिली. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी लवकरच या भागात दोन नवीन जलकुंभाचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध होणार असून या भागातील रहीवाशांचा पिण्याच्या पाण्याचा कायमचा प्रश्न सोडविणार असल्याचे आश्वासन दिले.

भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या माध्यमातून ८२ कोटीचा प्रस्ताव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आला असून इतर कामाबरोबर शहरांमध्ये नव्याने दहा पाण्याच्या टाक्यांचे बांधण्याचे काम या निधीमधून होणार आहे. आदर्श कॉलेज परिसरात जुन्या झालेल्या दोन्ही टाक्या डीसमेंटल करून नव्याने लवकरच बांधकाम होणार आहे. तसेच या दोन्ही टाक्यांना साफ करून घेण्याचे आदेश सुध्दा संबंधित अधिकाऱ्यांना दिले. लवकरच कॉलनीतील अंतर्गत रस्त्याचे कामही लवकर पूर्ण होईल. आदर्श कॉलेज परिसरातील पोलीस चौकी बाबतही पोलिस अधीक्षकांशी चर्चा करणार असल्याचे यावेळी आ. मुटकुळे यांनी सांगितले. यावेळी आशिष जैस्वाल, हरिभाऊ मुटकुळे, अमर घुगे, शिंदे, घ्यार, पतंगे, देवकर, दिपक सरनाईक, ठाकूर, फुलतांबकर, साठे, बांगर, सुभाष वानखेडे, गलांडे मामा, घुमनर, नायक, आंबेकर, मोहनराव नायक, पांडुरंग शिंदे, संतोष जाधव, नरवाडे, अतुल आंबेकर, जी. डी. मुलांगे, शंतिरत्न थोरात, अजय बोरकर, शंतनु पोले, अभिषेक सूर्यवंशी आदींची उपस्थिती होती.

# शिक्षकांचे प्रलंबीत मागण्यांसाठी आमरण उपोषण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

जिल्ह्यात शिक्षण विस्तार अधिकारी, केद्र प्रमुख, अराजपत्रित मुख्याध्यापक, उच्च श्रेणी मुख्याध्यापक आदी पदोन्नती या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी जिल्हा परिषद कार्यालयासमोर अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाच्यावतीने आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील शिक्षण विस्त-ार अधिकारी, केंद्र प्रमुख, अराजपत्रित मुख्याध्यापक, उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांच्या पदोन्नती तसेच शिक्षकांची दर्जोन्नती झाली नाही. मागील सहा वर्षापासून संघटना यासाठी झगडत आहे. तसेच चार वर्षापासून जिल्हा पुरस्काराचे वितरण करण्यात आले नाही, निवडश्रेणी, पदवीधर श्रेणी लागू करण्यात यावी, रिक्त पदे भरावीत, डीसीपीएस रकमेचा हिशोब शिक्षकांना देण्यात यावा यासह अकरा मागण्यांसाठी संघटनेच्यावतीने आमरण उपोषण करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेत पाठपुरावा करूनही मागण्या मान्य न झाल्यामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत असून या आंदोलनाला मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित झाले होते. दोन दिवसांपासून आंदोलन सुरू असून जिल्हा परिषद स्तरावरील नियमाने होणाऱ्या मागण्यांकडे दुर्लक्ष का करण्यात येत आहे असा सवालही यावेळी संघटनेच्यावतीने करण्यात आला आहे. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष व्ही डी देशमुख, सरचिटणीस हरिभाऊ मुटकुळे, कार्याध्यक्ष गजानन खिल्लारी, रमेश सुर्यवंशी, गजानन बोरकर, पी जी गिरी, मधुकर गडदे, जी डी पायघन, पी व्ही डांगे, संजय भक्कड, नागेश संगेपवाड, शंकर गायकवाड, भगवान माखणे, सी पी लोंढे, डी एस कोल्हे आदींसह मोठ्या संख्येने शिक्षकांनी सहभाग नोंदविला आहे.



**हिंगोली- राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांना वाढदिवसानिमित्त विविध राजकीय पक्ष आणि संघटनांकडून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी हिंगोली लोकसभेचे खा नागेश पाटील आष्टीकर यांनीही त्यांच्या निवासस्थानी जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील, गणेश शिंदे, दिलीपराव देशमुख, विलास चव्हाण, गणेश लुंगे, सचिन चव्हाण आदींची उप-स्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आज हिंगोलीत हिंदू धर्मरक्षकांच्यावतीने मोर्चा

हिंगोली- बांगलादेशच्या सत्ता कायापालट नंतर हिंदू लोकांवर अत्याचार कारणे, धार्मिक स्थळांची तोडफोड करणे याचा निषेध म्हणुन हिंदू धर्म रक्षक परिवाराच्यावतीने शनिवारी (ता.१७) हिंगोलीत मोर्चा काढला जाणार आहे. दरम्यान, बांगलादेशात सत्तापालट झाल्यानंतर तेथील मुस्लामांनी आपल्या हिंदु बांधवांवर अनंत अत्याचार करुन त्यांच्या हत्या करत आहेत. तसेच हिंदुची धार्मिक स्थळे उद्धवस्त करत आहे. यासाठी जगभरातील ईतर देश केवळ बघ्याची भूमिका बजावत आहेत. अशा घटना आपल्या देशातील काही राज्यामध्ये सातत्याने घडत आहे. आता आपला सनातन धर्म वाचवण्यासाठी आपण सर्व हिंदूंनी एकवटुन अश्या घटनाचा निषेध करावा व जगाला हिंदूची शक्ती, ताकद दाखवुन देण्याची वेळ आली आहे. यासाठी शहरामध्ये या निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या निषेध मोर्चात हिंदू समाजा-तील प्रत्येकाने सहभागी व्हावे, तसेच एकजूट दाखविण्यासाठी या मोर्चा मधे व्यापारी यांनी प्रतिष्ठान बंद ठेवून सह कुटुंब, मित्र परिवार सह उपस्थित राहण्याचे आवाहन हिंदु धर्म रक्षक परिवाराच्या वतीने करण्यात आले. हा निषेध मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून शनिवारी सकाळी ठीक १० वाजता निघणार आहे.

### ब्राम्हणवाडा सरपंचपदी सुमन मेटकर यांची निवड



हिंगोली- सेनगाव तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथील ग्रामपंचायतचे रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या निवडीसाठी १४ ऑगस्ट रोजी बुधवारी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सरपंच पदासाठी सुमनबाई निळकंठ मेटकर यांचा एकमेव अर्ज अध्याशी अधिकार्याकडे प्राप्त झाल्याने ब्राह्मणवाडा ग्रामपंचायतच्या सरपंचपदी सौ सुमन निळकंठ मेटकर यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.या निवडीबद्दल सुमनबाई मेटकर यांच्यासह उपसरपंच, सदस्यांचा गावकऱ्यांनी सत्कार केला. शिवाजीराव मेटकर यांच्या त्या वहिनी होत. याप्रसंगी शिवाजीराव मेटकर, अरुणा पंडित, भीमराव वैद्य,कौसल्या राठोड, सुनिता बाळू चव्हाण,प्रकाश पंडित, देविदास पंडित, उद्धवराव वायचाळ, दिलीप वायचाळ, श्रीराम पंडित, निळोबा पंडित, गौतम पंडित, यशवंता वैद्य, उमेश राठोड, नारायण चव्हाण, सिद्धार्थ पंडित, लक्ष्मण वायचाळ, बंडू वायचाळ, गजानन वायचाळ आदींची उपस्थिती होती.

# स्वातंत्र्य दिनी विविध मागण्यांसाठी नगर पालिका कर्मचाऱ्यांचे निदर्शने

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**



राज्यातील नगरपालिका, नगरपंचायतीमधील कर्मचारी, संवर्ग कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, कंत्राटी कामगार यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात विधानसभानिवडणुकीच्या कामकाजावर तसेच निवडणुकीच्या मतद-ानावर बहिष्कार टाकण्याबाबतचा इशारा यापूर्वी संघटनेने शासनाला दिलेला आहे. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी कर्मचाऱ्यांनी नगर पालिकेच्यासमोर विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याचे बॅनर लावून कर्मचाऱ्यांनी शासनाविरुद्ध असंतोष प्रकट करण्यासाठी निदर्शन व धरणे आंदोलन केले. यावेळी कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी केली या आंदोलनात कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला यावेळी कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विश्वनाथ घुगे, जिल्हा अध्यक्ष बाळू बांगर, उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे, नगर अभियंता रत्नाकर अडसिरे, सफाई कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय शिखरे सह सफाई विभागातील व कार्यालयीन विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# विविध राजकीय पक्ष, व्यापारी तसेच संघटनांकडून दिलीप चव्हाण यांना शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांचा दि १५ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी तसेच व्यापारी संघ आणि विविध संघटनांकडून सत्कार करीत शुभेच्छा देण्यात आल्या. यानिमित्त रक्तदान शिबीर आणि जिल्हा सामान्य रूग्णालयात रूग्णांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी दिलीप चव्हाण, डॉ यशवंत पवार, बंडू मुटकुळे, डॉ शिंदे यांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दिलीप चव्हाण यांचा स्वातंत्र्यदिन दि १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. येथील राष्ट्रवादी भवनात राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी त्यांचा पुष्पहार घालून सत्कार करीत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आ. गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, मराठा सेवा संघाचे खंडेराव सरनाईक, सचिन शिंदे, गुलाब भवर यांनीही वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ देत शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले. शिबीराचे उद्‌घाटन अश-ोक अग्रवाल यांनी केले यावेळी ईश्वर उरेवार, सौरभ चव्हाण यांची उपस्थिती होती. उबाठा शिवसेनेचे माजी आ. डॉ संतोष टारफे यांनीही शुभेच्छा दिल्या. हिंगोल लोकसभेचे खा नागेश पाटील आष्टीकर यांनी दिलीप चव्हाण यांना त्यांच्या निव-ासस्थानी जाऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील, गणेश शिंदे, दिलीप देशमुख, गणेश लुंगे, विलास चव्हाण, सचिन चव्हाण आदींची उपस्थिती होती. याशिवाय विविध सामाजिक संघटनांनी शुभेच्छा दिल्या.

# कारवाडी सरपंच, ग्रामसेवकविरोधात गुन्हे दाखल करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**



शहरानजीक असलेल्या कारवाडी ग्रामपंचायतीअंतर्गत खोटी मोजमाप पुस्तिका, इस्टीमेट तयार करून शासनाच्या रकमेचा अपहार केल्यामुळे तसेच खोटे दस्तावेज तयार करून शासन, प्रशासनाची दिशाभूल केल्यामुळे तत्कालील ग्रामसेवक आणि सरपंच यांच्यासह इतरांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी महिला ग्रामपंचायत सदस्य मंदाकिनी बालाजी टोंपे यांनी केली असून या मागणीसाठी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शहरानजीक असलेल्या कारवाडी या भागात सध्या प्लॉट आणि जमिनीची किंमत गगनाल भिडली आहे. येथील सरपंचाविरोधात अपात्र प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयात प्रलंबीत आहे ते तत्काल निकाली काढावे, ठक्कर बाबा आदिवासी योजनेंतर्गत पेव्हर ब्लॉकच्या कामाची मोजमाप पुस्तिका, संचीका आजपर्यंत उपलब्ध केली नाही, तत्कालीन ग्रामसेवकाने बोगस बांधकाम परवाने दिल्यामुळे त्यांचेवर गुन्हे दाखल करून सेवेतून बडतर्फ करावे, गावांतर्गत मुरूम न टाकता खोटी मोजमाप पुस्तिका, ईस्टीमेट तयार करून शासनाच्या रकमेचा अपहार केल्याचा आर-ोप निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनावर मंदाकीनी टोंपे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या उपोषणाला गटविकास अधिकारी डी वाय गायकवाड यांनी भेट दिली आहे.

# एक शाम, तिरंगे के नाम कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ ऑगस्ट**



शहरातील रिस-ाला बाजार भागात असलेल्या रमेशचंद्र बगडिया यांच्या निव-ासस्थानी नर्मदेश्वर म-हादेव मंदिर परिसरात एक शाम तिरंगी के नाम कार्यक्रमाला बच्चे कंपनीसह अबालवृध्दांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी रमेशचंद्र बगडिया यांच्यावतीने नर्मदेश्वर महादेव मंदिरात देशपर सजावट करण्यात आली होती. संध्याकाळी लहान मुलांसाठी देश भक्तीपर स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये अनेक लहान मुला मुलींनी सहभाग घेतला होता. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, माजी आमदार गजानन घुगे, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, रमेशचंद्र बगडिया यांची प्रमुख उपस्थिती होती. देशभक्तीपर घेण्यात आलेल्या स्पर्धेत प्रथम क्रमांक सुप्रिया शिव यादव या मुलीला मिळाला तर द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक हिला मिळाला. विजेत्या स्पर्धकांना माजी आमदार गजानन घुगे यांच्याहस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

नर्मदेश्वर महादेव मंदिरात भव्य महाआरती करण्यात आली. त्यानंतर आलेल्या भावी भक्तांना प्रस-ादाचे वाटप करण्यात आले. एक शाम तिरंगे के नाम या कार्यक्रमामुळे नर्मदेश्वर महादेव मंदिर परिसर देश भक्ती पर गीतांमुळे आनंदमय झाला होता. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नर्मदेश्वरच्या भाविकांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य शासकीय समारंभात जिल्हाधिकारी अभिजीत यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत सकाळी ९.०५ वाजता हर्षोल्हासात त्यांनी ध्वजवंदन केले. यावेळी जिल्हावासियांना त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्यासाठी अनेकांना पुरस्कार बहाल केले. राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज धुळे येथे ध्वजवंदन केले. तथापि, स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर नांदेड जिल्ह्यातील तमाम नागरिकांना त्यांनी शुभेच्छा संदेश दिला आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय मधील या सोहळ्याला आज ध्वजवंदन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.



भारतीय स्वातंत्र्याचे ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित या समारंभास विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांच्यासह सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

ध्वजवंदनानंतर सलामी देण्यात आली. परेड कमांडर पोलीस निरीक्षक अविनाश धोंडगे यांनी सलामी पथकाचे नेतृत्व केले. पोलीस दलाच्या सलामीनंतर राष्ट्रगीत, राज्यगीत नंतर जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी उपस्थित मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिक, त्यांचे कुटूंबिय यांची त्यांनी आस्थेने विचारपूस केली. वीरमाता, वीरभगीनी यांच्यासह या विशेष कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांना भेटून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, माजी विधान परिषद सदस्य अमर राजूरकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार बी.आर. देशमुख, माजी आमदार गंगाधर पटणे आणि स्वातंत्र्य सैनिकांचे वारस आदीची उपस्थिती होती.

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय समाजात फुट पाडणारा : प्रा. कवाडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण वर्गीकरणाचा घेतलेला निर्णय हा असंवैधानिक असून सामाजिक फुट निर्माण करणारा असल्याची प्रतिक्रिया पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्टीय अध्यक्ष प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दिली आहे.

नांदेड येथे पिपल्स रिपब्लिकन पार्टीची राज्यस्तरीय बैठक नांदेडात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या निमित्ताने ते नांदेड येथे आले असता पत्रकारांशी बोलत होते. यावेळी पिपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदिप कवाडे, प्रदेशाध्यक्ष गणेश उनवने, कार्याध्यक्ष चरणदास इंगोले, प्रदेश महामंत्री बापूराव गजभारे आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.जोगेंद्र कवाडे म्हणाले की, आरक्षण वर्गीकरणाच्या घेतलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने विचार करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने याबाबत विचार न केल्यास संसदेचे विशेष अधिवेशन घेवून हा निर्णय रद्दबातल करावा, देशात अनुसूचित जातीला १३ टक्के तर अनुसूचित जमातीला ७.५ टक्के आरक्षण आहे. आरक्षणाचे वर्गीकरण केल्यास शुन्यच्या प्रमाणात याचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे संसदेचे विशेष अधिवेशन घेण्याची मागणी यावेळी प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे देशातील सर्व मागासवर्गीय संघटनांनी हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली असून, दि.२१ ऑगस्ट रोजी भारत बंदचे आवाहन देखील केले आहे.

पिपल्स रिपब्लिकन पार्टीची शिवसेना एकनाथ शिंदे यांच्याशी आघाडी आहे. परंतू लोकसभा निवडणुकीत मित्र पक्षांना जो सन्मान द्यायला पाहिजे होता किंवा ज्या पध्दतीचा समन्वय साधण्याची गरज होती, तसे करण्यात आले नाही. त्यामुळे मित्र पक्षामध्ये नाराजी आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान महायुतीमधील घटक पक्षांशी समन्वय साधावा, असेही ते यावेळी म्हणाले. त्याचबरोबर महायुतीकडे पीआरपी पाच जागेची मागणी करणार आहे. योग्य चर्चा न झाल्यास राज्यात ३१ उमेदवार स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तसेच देगलूर-बिलोली मतदारसंघातून बापूराव गजभारे हे संभाव्य उमेदवार असतील, अशीही माहिती त्यांनी यावेळी दिली.




या पत्रकार परिषदेस प्रदेश संघटक प्रमोद टाले, नंदकुमार गोधने, राजू मोरे, युवा आघाडीचे कपिल लिंगाये, वैलास बोमल, मृणाल गोस्वामी, विलास निकाळजे, अरुण गायकवाड, गजानन माने, जिल्हाध्यक्ष विनोद भरणे, महानगराध्यक्ष साहेबराव सोनकांबळे, आकाश गजभारे, संघरत्न कंधारे, राजेंद्र हिवाळे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

# गोपाळचावडीच्या नुतन सरपंच सुरेखा लाखे यांच्या हस्ते ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१६ ऑगस्ट -**

गोपाळ चावडी ग्रामपंचायतच्या नव्याने निवड झालेल्या सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते दिनांक १५ ऑगस्ट २०२४ स्वातंत्र्यदिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय येथे राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आला.



नांदेड शहरजवळील व सिडको हडको परिसरातील गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालय येथील सरपंच पदासाठी एक विशेष बैठकी दिनांक १४ ऑगस्ट रोजी घेऊन त्यात सदरील सरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. तत्कालीन सरपंच गिरजाबाई डाकोरे यांनी राजीनामा दिल्या नंतर निवडणूक घेऊन १४ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजता नूतन सरपंच पदी सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी पिठासीन अधिकारी तथा एच. एन. सुजले गावकर, तलाठी आर.एन. भिंगोरे, ग्रामविकास अधिकारी पी.डी. उबाळे यांच्या उपस्थित निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी ग्रामपंचायतचे उपसरपंच साहेबराव सेलूकर यांच्यासह सर्व सदस्य व ग्रामस्थांची उपस्थित होते. सरपंच पदाची निवडून झाल्यानंतर लगेचच स्वातंत्र्यदिनानिमित्त नूतन सरपंच सौ. सुरेखा लाखे यांच्या हस्ते ग्रामपंचायत कार्यालय येथे राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले.

# 'तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड' कार्यक्रमास उत्सफुर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त दि. १५ ऑगस्ट रोजी ' तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड' हा विविध कलागुणांचा महोत्सव आयोजित करण्यात आला .

भाजपाचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड आयोजीत हा कार्यक्रम स्व. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या पुतळ्यासमोर सकाळी ७ ते दुपारी २ या वेळेत हा कार्यक्रम पार पडला. यां कार्यक्रमास माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण, माजी आ. अमर राजुरकर , महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा नेते प्रविण साले, मिलिंद देशमुख, देविदास राठोड, सचिन उमरेकर, विजय गंभीरे आदीसह अनेकांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रध्वजाला सलामी व राष्ट्रगीताने झाली. तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड या कार्यक्रमात अनेकांनी देशभक्तीपर रॅप गाणे गायले. जगदंबा ढोल ताशाच्या गजरात राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली. रक्तदान शिबीर आयोजीत करण्यात आले. या शिबिरात अनेकांनी स्वंयस्फुर्तीने सहभाग नोंदवला.

तिरंगा स्ट्रीट ऑफ नांदेड हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड व मित्र मंडळाने परीश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त

### महाराष्ट्र शासनाचा अल ईम्रान प्रतिष्ठानला जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**बिलोली**-महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र



राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेडच्या वतीने अल ईम्रान प्रतिष्ठान बिलोली या संस्थेला दि.१५ आगस्ट २०२४ रोजी गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष डा.मोहसीन खान यांना जिल्हा युवा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण सोहळ्यास व्यासपिठावर जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार,महानगरपालिकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी महेश डोईफोडे,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,अप्पर जिल्हाधिकारी बोरगावकर,ना. तहसिलदार मकरंद दिवाकर,जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार ठेंभरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.सदरिल कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले.अल ईम्रान प्रतिष्ठानला मिळालेल्या पुरस्काराबद्दल नेहरु युवा केंद्रांच्या संचालिका चंदा रावळकर,क्रीडा अधिकारी प्रविण कोंडेकर,संजय बेतीवार,राहुल श्रीमनवार,चंद्रप्रकाश होनवडजकर,बालाजी शिरशीकर,शिवकांता देशमुख सह संतोष कणकवार,संजय चव्हाण,आनंद जोंधळे,मोहन पवार,सुभाष धोंगडे,यश कांबळे,विद्यानंद भालेराव,ज्ञानेश्वर थोटे,नगरसेवक प्रतिनिधी आजम बेग,कैलास गायकवाड,विनोद कुटे पाटील यांच्यासह पत्रकार,मित्र परिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

### जुना लोह्यात श्रीमद् भागवत कथा ज्ञानराज सोहळा

**लोहा** -श्री संत मोतीराम महाराज यांच्या पुण्यतिथी व श्रावण मासानिमित्त जुन्या लोह्यातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दि. १६ ते २२ ऑगस्ट दरम्यान सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात श्रीमद् भागवत कथा व ज्ञानराज सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून सदरील सोहळ्यात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्धापूरच्या अमोल सरोदेला महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,१६ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्य शासकीय समारंभात जिल्हाधिकारी अभिजीत यांच्या हस्ते आज ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्यसैनिक व विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उपस्थितीत सकाळी ९.०५ वाजता हर्षोल्हासात त्यांनी ध्वजवंदन केले. यावेळी जिल्हावासियांना त्यांनी शुभेच्छा दिल्या तसेच विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कार्यासाठी अनेकांना पुरस्कार बहाल केले.



अर्धापूरच्या अमोल जयशिला उद्धवराव सरोदे यांनी युवक विकासाच्या कार्यामध्ये उत्तम कामगिरी करून समाजातील असंघटित युवांना संघटीत करून तरुणांच्या व नागरिकांच्या सुप्त गुणांना संधी देऊन भरीव योगदान दिले. या सामाजिक कार्याची दखल घेऊन वर्ष २०२१-२०२२ साठीचा जिल्हा युवा पुरस्कार जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते १० हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी हा पुरस्कार अमोलने वडील उद्धवराव सरोदे व आई जयशिला सरोदे यांच्या समवेत स्वीकारला.

**पुरस्कार प्रेरणा देणारा : अमोल सरोदे**

पुरस्कार हा अजून काम करण्याची प्रेरणा देतो आणि जबाबदारी वाढते. समाजाला आपलं काहीतरी देणं लागतं ह्या भूमिकेतून समाजाच्या सेवेसाठी मी तत्पर असेन. हा पुरस्कार मी माझ्या आईवडिलांना समर्पित करतो, अशी प्रतिक्रिया जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त अमोल सरोदे यांनी दली.

# ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्यास हजाराचे संख्येने सामील व्हा : बद्दीवार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,१६ ऑगस्ट -**

विचार उद्याचा ओबीसीच्या भवितव्याचा तुमचे आमच्या अस्तित्वाचा हा बुलंद आवाज घेऊन ओबीसी आरक्षण बचाव मेळावा दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथे मोंढा मैदान येथे होणार असून या मेळाव्यास हजारोच्या संख्येने किनवट माहूर मतदारसंघातून उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा अध्यक्ष रमेश बद्दीवार यांनी केले आहे.



ओबीसी आरक्षण बचाव मेळाव्याचे नेतृत्व प्राध्यापक लक्ष्मण हाके यांच्या नेतृत्वाखाली होऊ घातलेल्या ओबीसी आरक्षण बचाव मेळावा दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथे होणार असून या मेळाव्यात जास्तीत जास्त ओबीसी बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावे सदरील मेळाव्यात जातनिहाय जनगणना करणे, मराठा व इतर कोणत्या जातीचा नव्याने ओबीसी मध्ये समावेश करू नये, महाराष्ट्र सरकारने मागील सप्टेंबर २०२३ दिवस पासून दिलेले सर्वच खोटे ५८ लाख कुणबी प्रमाणपत्र रद्द करणे, सगळे सगे सोयरे अध्यादेश रद्द करणे, २०२०३ पासून खोट्या कुणबी प्रमाणपत्रावर नोकरीवर उपस्थित झालेल्या सर्वाना कमी करून टाकने, खोटे पुरावे सादर करून प्रमाणपत्र सादर करणाऱ्या वर गुन्हा दाखल करणे यासह इतर मागण्या घेऊन ओबीसीचा बुलंद आवाज करण्यासाठी व झोपलेल्याचे सोंग घेतलेल्या शासनाला जागे करण्यासाठी दिनांक १८ ऑगस्ट रोजी भोकर येथील मोंढा मैदान येथे भव्य स्वरूपाचे ओबीसी आरक्षण बचाव मेळावा आयोजित केला असून या मेळाव्या जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गोल्ला समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश बद्दीवार यांनी केले आहे

# उमरीच्या मॉडर्नने प्रभातफेरीतून दिला पर्यावरणाचा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,१६ ऑगस्ट -**

उमरी येथील मॉडर्न इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांनी भारतीय स्वातंत्र दिनाचे निमित्ताने शहराच्या मुख्य रस्त्यावरुन सायकल रॅली काढून पर्यावरणाचा संदेश दिला.

शाळेत सकाळी ७:३० वाजता आदर्श शिक्षिका म्हणून सन १९९७ ला राष्ट्रपती पुरस्कार मिळालेल्या सौ. कुमुदिनी अरविंद ढवळेकर यांचे हस्ते झेंडावंदन झाले. त्यानंतर शहरातील प्रमुख रस्त्याने शालेय विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात आली त्यात शाळेचे बँडपथक, स्काऊट, गाईड चे विद्यार्थी, तसेच इको क्लब अर्थात पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचे समुहाने काढलेली सायकल रॅली प्रभात फेरीचे प्रमुख आकर्षण होते. शिस्तबध्द निघालेली प्रभात फेरी, भारतमाताकी जय, वंदेमातरमच्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेले होते. सायकल रॅलीचे शहरातील नागरिकांनी व पालकांनी कौतुक केले. ह्या रॅलीत नर्सरी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अनुराधा संजय कुलकर्णी, संचालिका सानिका कुलकर्णी आणि सर्व स्टाफने मेहनत घेतली.

# श्री सुभाष शुगर व शिऊर कारखाना येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,१४ ऑगस्ट -**

श्री. सुभाष शुगर प्रा. लि. हडसनी ता. हदगाव व शिऊर साखर कारखाना म. वाकोडी ता. कळमनुरी या दोन्ही कारखान्यांमध्ये स्वतंत्र्याच्या दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात कर्मचाऱ्यांच्या मुलांपैकी गुणवंत विद्यार्थ्यांचा कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने प्रशस्तीपत्र व रोख रक्कम आणि साखर बॅग देऊन गौरव करण्यात आला तर या गौरव वितरणाचे यंदाचे हे चौथे वर्ष होते.

स्वातंत्र्याच्या दिनानिमित्त श्री. सुभाष शुगर या साखर कारखान्याच्या प्रांगणात दीपक शंकरराव पवार ( टर्नर ) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच शिऊर साखर कारखाना वाकोडी ता. कळमनुरी येथे शेख सय्यद शेख वाहिद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमानंतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला श्री. सुभाष शुगर कारखाना हडसणी व शिऊर साखर कारखान्याचे चेअरमन सुभाषराव लालासाहेब देशमुख कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख यांच्या संकल्पनेतून आपल्या कारखाना कर्मचाऱ्यांच्या मुला-मुली पैकी जे विद्यार्थी दहावी व बारावी मध्ये चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले त्यांना प्रोत्साहन देण्याचे उद्देशाने स्वातंत्र्यदिनी सन्मान करण्याची सलग चार वर्षाची परंपरा कायम राखली आहे. या गौरव सोहळयात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, रोख ५००० रु. आणि साखर बॅग देऊन सन्मान करत असतात त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा श्री सुभाष शुगर कारखानाच्या प्रांगणात पार पडलेल्या कार्यक्रमात जनरल मॅनेजर राजेश मानधना , मधुकर पतंगे, हेडे, गीते, अविनाश सूर्यवंशी, गावंडे ,शेतकी अधिकारी किशोर वानखेडे तसेच शिऊर साखर कारखाने येथे पण त्याचप्रमाणे कार्यक्रम पडला यावेळेस जनरल मॅनेजर संभाजी नातू ,सोमापा, दोन्ही कारखान्यात सदरील कार्यक्रमाच्या वेळी सर्व अधिकारी कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

# प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना आरोग्यरत्न रत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,१६ ऑगस्ट -**

पुरुषोत्तम धोंडगे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकशाही न्युज चॅनलच्यावतीने आरोग्यरत्न सन्मान २०२४ हा पुरस्कार मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दि.१४ ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला.




ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी,माजी खासदार व आमदार डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ लोहा- कंधार तालुक्यातील प्रत्येक गाव,वाडी,तांडा व शहरातील वयोवृद्ध व्यक्तींच्या डोळ्याचे शिबिर आयोजित करुन मोफत शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेऊन अंधमुक्तीचा संकल्प केला. व ३ हजार लोकांच्या डोळ्यांची यशस्वी शस्त्रक्रिया पहिला टप्यात पार पडली. प्रत्येक शिबीरासाठी गावागावात प्रा.पुरुषोत्तम धोंडगे व त्यांची पत्नी मनिषाताई धोंडगे उपस्थित होत्या. . या सर्व बाबींची दखल घेऊन लोकशाही न्यूज चॅनलच्या वतीने प्रा.डॉ.पुरुषोत्तम धोंडगे यांना दिलेल्या पुरस्कारामुळे कंधार व लोहा तालुक्यात त्यांचे कौतूक होत आहे.

# नारायणा प्रशासकीय सेवा महाविद्यालयच्या वतीने स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,१६ ऑगस्ट -**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक संलग्रित नारायणा प्रशासकीय सेवा महाविद्यालय लोह्याच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेव योजना अंतर्गत श्रमदानाने राष्ट्रपुरुष,स्वातंत्र्य सैनिक यांच्या पुतळे परिसरात स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.

या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकानी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून स्व. शांतिदुत गोविंदराव पाटील चिखलीकर उद्यान, हुतात्मा स्मारक परिसरात स्वच्छता मोहीम राबवून जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी कै. भाई केशवराव धोंडगे, राष्ट्रपुरुष वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून परिसर स्वच्छ सुंदर ठेवण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या मोहिमेत नारायणा प्रसाकिय सेवा महाविद्यालयातिल प्राचार्य शिवाजी केंद्रे, प्रा. प्रवीण मुंडे, प्रा. महेश टाकणखार, प्रा. नबील नवाब, प्रा. रितेश बोरोळे तसेच सुमन केंद्रे मॅडम व कांता केंद्रे सोबतच महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न केला.

# 'शक्तीपीठ' मार्ग स्थगितीसाठी बंटी पाटलांची भेट; जिल्ह्यातील कृती समिती सोबत चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,१६ ऑगस्ट -**

नागपूर गोवा शक्तीपीठ मार्ग उभारणीसाठी भाजप शिंदे सरकारच्या हालचाली वाढल्या असून जवळपास ८४ हजार कोटी रुपये खर्चून महामार्ग उभारला जाणार आहे. नांदेड जिल्ह्यातील जवळपास सहाशे हेक्टर सुपीक तर मराठवाड्यातील अडीच हजार हेक्टर जमीन यामध्ये अधिग्रहित होणार आहे. त्यामुळे नागपूर ते कोल्हापूर या प्रस्तावित रस्त्यावरील सर्वच शेतकरी महामार्गाच्या विरोधात उभे असून पश्चिम महाराष्ट्रात या आंदोलनाचे प्रमुख आ. सतेज उर्फ बंटी पाटील नांदेड येथे आले असता स्थानिक शेतकरी व कृती समितीने भेट घेत रस्त्याच्या स्थगितीसाठी काय काय करता येईल यावर विस्तृत चर्चा केली.

बंटी पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच विधिमंडळात शेतकऱ्यांना देशोधडीला लावू पाहणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा अशी प्रखर भूमिका मांडली. तसेच पाटील पश्चिम महाराष्ट्रात शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात असलेल्या शेतकऱ्यांना नेतृत्व दिल्याने तेथील शेतकऱ्यांचा आवाज सरकारच्या कानावर गेला आहे. मराठवाड्यातील आंदोलन आणि रणनीती ठरविण्यासाठी शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीचे संयोजक संगमनाथ आवर्डे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे हनुमंत राजेगोरे, प्रा. संदीपकुमार देशमुख, धोंडिबा कल्याणकर, सुभाष मोरलवार, आनंदा देशमुख, नवनाथ कऱ्हाळे, गोविंद घाटोळ, शहानंद मुधोळ यांनी बंटी पाटील यांच्या सोबत भरत इ स्क्वेअर येथे भेट घेत चर्चा केली.

**शक्तीपीठ मार्ग गोव्याच्या भल्यासाठी: प्रा. संदीकुमार बारडकर**

नागपूर - गोवा शक्तीपीठ महामार्ग हा महाराष्ट्र लुटून गोव्याच्या भल्यासाठी उभा करण्यात येणारा मार्ग होय. सरकारच्या ठेकेदारांची यातून चांदी होणार असून शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरवला जाणार आहे. देवाला जाण्यासाठी अनेक महामार्ग असतांना येथील तरुण गोव्यात लवकरात लवकर पोहोचावा म्हणजेच केवळ गोव्याच्या भल्यासाठी, तेथील दारू व्यावसायिक, मटका, आणि केसिनो वाल्यांना मालामाल करण्यासाठी हा रस्ता उभा केला जाणार आहे. तो रस्ता रद्द होणे आवश्यक असून शेतकरी वाचविण्यासाठी मोठे जनानोंदलन करण्याचा इशारा प्रा. संदीपकुमार देशमुख बारडकर यांनी दिला आहे.

